श्री साईनाथ प्रसन्न.

# श्री साईलीला

## मासिक पुस्तक.

वर्ष १० अंक ७ ] आश्विन [ श. १८५५

नलिनीदलगत जलमतितरलम् । तद्वज्जीवनमतिशय चपलम्



क्षणमपि सज्जनसंगतिरेका । भवति भवार्णव तरणे नौका

—शंकराचार्य.

संपादक:—रामचंद्र आत्माराम तर्खड.

# अनुक्रमणिका


| | पृष्ठें |
|---|---|
| अनुभव ... ... ... ... ... | १-१४ |
| बाबांनीं स्वप्नांत दिलेली भेट खरी ठरली ... ... | १५-१७ |
| श्री. साठेसाहेबांचा वाडा श्री. नवलकरांचा होण्यास पाया केव्हां व कसा घातला गेला? ... ... ... | १८ |
| कै. दामोदर घनःश्याम यांच्या मृत्युपत्रांतील अटींसंबंधाच्या अर्जाच्या अखेर निकालाची हकीकत ... ... | १९-२९ |
| पुण्यतिथिउत्सव ... ... ... ... | ३० |
| ऑगस्ट महिन्याचें शिर्डीवृत्त ... ... ... | ३१ |
| कै. कमलाक्ष विश्वनाथ प्रधान ... ... ... | ३२-३६ |


## विनंति.

वर्गणीदारांस नम्र विनंती करण्यांत येत आहे कीं, या सालीं V. P. करण्यांत आली नसल्यामुळें ज्यांनीं वर्गणी अद्यापी पाठविली नाहीं त्यांनीं कृपा करून ती खालील पत्त्यावर पाठवून द्यावी. अथवा V. P. करण्याचें सुचवावें.

**रा. आ. तर्खड,**

व्यवस्थापक—**श्रीसाईलीला**

५१ E. पार्ला रोड, खार, मुंबई २१; आणि ऑ. खजिनदार,

**श्रीसाईबाबा शिरडी संस्थान.**

---

सुप्रसिद्ध श्री. मोरोपंत कविकृत **केकावलि** या भक्तिरसप्रेमामृतनें ओथंबलेल्या काव्यावर कै. रा. ब. दादोबा पांडुरंग यांची "यशोदा पांडुरंगी" टीका जी साठ वर्षांपूर्वी छापून प्रसिद्ध झाली होती व आजमितीस अत्यंत दुर्मिळ झाली होती तिची दुसरी आवृत्ति छापून तयार झाली आहे. किं. रु.२

**रा. आ. तर्खड,**

व्यवस्थापक—**श्रीसाईलीला कचेरी.**

## श्रीसाईभक्तांस विज्ञप्ति.

कोणाला श्रीसाईमहाराजांबद्दलचे त्यांचे स्वतःचे अनुभव श्रीसाईलीलेंत सिद्ध व्हावे म्हणून पाठविण्याचे असतील त्यांनीं ते आमचेकडे पाठविल्यास ते प्रसिद्ध होण्याबद्दल आदरपूर्वक योग्य तो विचार होईल.

**रा. आ. तर्खड,**

—प्रकाशक.

# अनुभव

शनिवार ता. ३ जून या दिवशीं श्री. शांताराम बळवंत नाचणे, शिरस्तेदार मॅजिस्ट्रेट कचेरी, कुर्ले, हे भेटावयास आले होते. सेवक त्या वेळीं इन्फ्लुएन्झानें आजारी पडला होता. अंगांत ताप असून पाठींत सारख्या ठणका मारत होत्या.

श्री. नाचणे आपल्या स्वभावसिद्ध सौजन्यानें सेवकाच्या पथारीवर बसून श्रीसाईबाबांच्या गोष्टी अत्यंत गोड शब्दांनी सांगत होते; त्यांतली एक हकीकत वाचकांच्या प्रेमळ वृत्तींना पोषक अशीच असल्यामुळें येथें नमूद केल्याशिवाय राहवत नाहीं.

श्री. नाचणे शिरडीस गेले असतां त्यांच्या कुटुंबाला श्रीसाईबाबांनीं आशीर्वाद दिला होता कीं, "आये, तुला एक नामी मुलगा होईल; पण तो तुला फार दिवस लाभणार नाहीं." त्या आशीर्वादानुसार एक सुंदर मुलगा अवतरला. मुलगा सर्वगुणी संपन्न असून अगदीं शिशुवयांत आपल्या गुणांनीं सर्वांना अत्यंत आवडता झाला. स्मरणशक्ति अद्वितीय, आज्ञाधारकता अवर्णनीय, स्वभाव सालस व अगदीं थंड, राग वगैरे स्वप्नींही नाहीं, इतकेंच नव्हे, तर कांहीं कारणानें घरांतल्या कोणाला राग आल्यास, हा मुलगा त्याच्या गोड व शांत स्वभावानें त्याचें समाधान करीत असे.

श्रीसाईबाबांच्या छबीपुढें बसून तो आरत्या वगैरे आनंदानें गात असे.

तो सुमारें पांचएक वर्षांचा झाला असेल. आपल्या बापाशेजारीं बिछान्यांत झोंपी जात असतांना पहाटेच्या सुमाराला डोक्यावरून पांघरूण घेऊन बसलेला तो त्यांच्या वडीलांना दिसूं लागला. तो असें कां करितो, याविषयीं त्यांनीं त्याच वेळीं विचारपूस केली नाहीं.

श्री. नाचणे म्हणाले, "वरीलप्रमाणें प्रकार घडण्यापूर्वी एके सुटीच्या दिवशीं कै. अच्युतराव कोल्हटकरांच्या संदेशच्या स्पेशल अंकावर श्रीकृष्ण भगवानाचा एक मनोवेधक चेहरा असे, तो कातरीनें कापून घेऊन एका जाड

पुठ्याबर मीं चिटकविला, आणि तो श्रीसाईबाबांच्या फोटोजवळ देव्हाऱ्यांत ठेवला. तसेंच हिज मास्टर्स व्हॉइस (एक फोनोग्राफ आहे, आणि त्याच्या-पुढें एक कुत्रा अत्यंत जिज्ञासेनें आपल्या धन्याचा आवाज त्या भुंगळींतून येत असलेला ऐकत आहे ) हें चित्र पण कापून काढून एका जाड पुठ्याबर चिट-कवून तें पण त्या देव्हाऱ्यांत एका बाजूस ठेविलें. असें करण्याचा माझा कांहीं विशिष्ट हेतु पण नव्हता. दोन्हीं चित्रें बरीं वाटल्यावरून तीं वरील-प्रमाणें शोभेसाठीं म्हणून ठेविलीं.''

असो. मुलगा याप्रमाणें डोक्यावर पांघरूण घेऊन बसत असे. असें तो कां करितो, म्हणून कांहीं दिवसांनंतर त्याला हलकेच विचारतां तो म्हणाला,

'' तो कुत्रा त्या चित्राप्रमाणें आपल्या धन्याचा आवाज ऐकत आहे, आणि त्याला तो आवाज ऐकूं येत आहे हें खरें ना ? ''

'' होय. ''

'' त्याचप्रमाणें श्रीसाईबाबांचा आवाज ऐकूं येत असतो.''

'' तें कसें ? ''

'' त्याचा अभ्यास केला पाहिजे. ह्या चित्रावरून श्रीसाईबाबांचे शब्द ऐकूं आलेच पाहिजेत असें मला खास वाटलें. आणि म्हणून पहांटेच्या शांत वेळीं मी डोक्यावरून पांघरूण घेऊन बसून ते शब्द ऐकण्याची हौस वाटून तसें करूं लागलों पहिल्या पहिल्यानें घोंगाट ऐकूं आला, तरी तसाच बसून राहिल्यानें बाबांची मूर्ति डोळ्यांपुढें येऊं लागली. त्यामुळें आनंद वाटला. पुढें पुढें बाबांचे डोळे माझ्याकडे प्रेमानें पाहतात असेंही दिसूं लागलें. तरी त्यांच्या तोंडचे शब्द ऐकण्याची हौस सोडली नाहीं. पुढें त्यांचे ओठ हाल-तांना दिसले. कांहीं अस्पष्ट शब्द ऐकूं आले. तेव्हां तर फारच गोड वाटलें ! पुढें पुढें त्यांचे शब्द अगदीं स्पष्टपणें ऐकूं येऊं लागले.''

''जसे शिरडीस असतांना बाबा बोलत असत त्याप्रमाणेंच ते बोलत व मी ऐकत असें. पुढें त्यानीं श्रीकृष्ण भगवंतांच्या चित्राकडे माझें ध्यान खेंचलें.''

"श्रीकृष्ण भगवंताच्या बाळलीला दिसूं लागल्या. भगवानांचे शब्द गोड व बोबडे आहेत. त्यांचें चालणें जरा चमत्कारिक आहे. ते इतर मुलांप्रमाणें चालत नाहींत. पहिल्या पहिल्यानें ते दूर दिसत व माझ्याकडे हळूहळू चालत येत आहेत असें दिसूं लागलें. नंतर ते झपाट्यानें दुडदुड धांवत येऊन माझा हात धरून आपल्या सर्व लीला त्यांनीं मला प्रत्यक्ष दाखविल्या."

"हें पाहा! श्रीकृष्ण भगवंत आपल्या लीला त्याच त्याच रोज एकच तऱ्हेनें तुला दाखवितात कीं कसें?"

"नाहीं. दररोज त्या लीलांमध्यें पुष्कळ निरनिराळ्या तऱ्हा असतात. हें पाहा, एकदा श्रीकृष्ण भगवान एका गवळ्याच्या पाठीवर बसून शिक्यांतल्या दुधाच्या मडक्याला भोंक पाडून सर्व गोपाळांच्या तोंडांत त्याची धार फिरवीत होते. ज्या गोपाळाच्या पाठीवर ते बसले होते, त्याला आपणालाही ती दुधाची धार मिळावी असें वाटलें. तेव्हां त्यानें आपल्या पाठीवरल्या श्रीकृष्णाच्या पायांच्या पोटऱ्यांना हळूच गुदगुल्या केल्या व आपली मान बाजूला वळवून तोंड उघडून आ केलें. श्रीकृष्णानें तें जाणून त्या दुधाची धार अशी फिरविली कीं, ती बरोबर त्याच्या तोंडांत गेली. आणि माझी खात्री आहे कीं, भगवंताच्या लीलांच्या वर्णनांत ती तुम्हाला कोठेंही आढळणार नाहीं."

प्रेमळ व भाविक वाचक हो, हें वाचतांना आपणाला काय होत असेल, अष्टभाव कसे प्रदीप्त होत असतील व डोळ्यांतून प्रेमाश्रु वाहून कंठ सद्गदित होऊन सर्वांगावर स्वेदादी भावना कशा होत असतील याची अंधुक कल्पना लेखकासारख्याला आधुनिक विद्येनें मन दूषित झाल्यामुळें आणि त्यामुळें फाजिल चिकित्सक भावनांना प्रोत्साहन मिळालें असूनही झाली. तो आपलें दुखणें विसरला; बिछान्यांत बसून श्री. नाचणे यांच्या तोंडांतून निघणाऱ्या शब्दौघांचें प्राशन बुभुक्षित् रीतिनें करीत होता.

श्री. नाचणे म्हणाले, "बाबासाहेब, हें गोड रत्न श्रीसाईभगवांनीं सांगितल्याप्रमाणें आम्हाला लाभलें नाहीं. पांच वर्षांचा झाल्यावर एके

दिवशीं साधारण ताप आला. रीतसर औषधोपचार आम्ही केलेच. प्रयाणाच्या दिवशीं सकाळीं आपल्या गळ्यांतला श्रींचा फोटो काढून तो माझ्याजवळ दिला आणि म्हणाला, "आतां मला याचा उपयोग नाहीं." तो असें काय करतो हें कळेना. नंतर कांहीं वेळानें श्रींच्या देव्हाऱ्यांतल्या छबीकडे पाहत व त्यांची आरति म्हणत बसल्या बसल्या आपला देह माझ्या अंगावर ठेविला.'

याप्रमाणें सेवकाच्या डळमळणाऱ्या मनोवृत्तींच्या आंदोलनाला स्तब्ध करून व सेवकावर पूर्ण कृपा करून श्री. नाचणे कुर्ल्यास गेले.

त्या रात्रीं व त्यानंतर सेवकाच्या मनोवृत्तींना त्याच्या आधुनिक शिक्षण-प्रभावांप्रमाणें चालना मिळाली.

त्या मुलाला ( (Illusion) इल्यूझन अथवा (Hallucination) हॅल्युसिनेशन ( कल्पित अथवा अकल्पित प्रकार) दिसून येत होते काय? पण असे प्रकार दिसणें हा एक मेंदूचा विकार आहे, आणि तशा प्रकारानें पीडित मनुष्य एकलकोंडें व सर्वांपासून दूर असणें अशा प्रकारानें वावरत असतें. चर्येवर एक प्रकारची खिन्नता अथवा निस्तेजता दिसून येत असते. असा प्रकार या मुलाच्या ठिकाणीं मुळींच नव्हता. चर्या सुप्रसन्न, वृत्ति आनंदी, बोलणें, चालणें, खेळणें उत्तम ( Healthy ) निरोगी मुलाप्रमाणें. तर त्या मुलाला वरीलप्रकारें वर्णन केलेल्या मानसिक व्यथा तर खास नव्हत्या. तर मग हा प्रकार होता तरी काय ?

ज्याला इंग्रजींत हॅल्युसिनेशन म्हणतात तसा जर हा प्रकार असता तर त्या मुलाची दृष्टि बावरलेली दिसती. हॅल्यूसिनेशन झालेल्या मनुष्याला एकच प्रकारचा दृष्टिविकार झालेला असतो, आणि तोच तोच एकच देखावा त्याच्या नजरेपुढें येतो. डोळ्यांचा विकार झालेल्या मनुष्याला कोळीष्टकें वगैरे दिसतात व तीं खालीवर नाचत असतात. कित्येकांना डोळ्यांतल्या रेटिना-( पडद्या ) वर कांहीं विशेष ठिकाणीं विकार झाल्यामुळें कुत्रीं, ससे, हरणें वगैरे दिसतात; आणि त्यामुळें त्यांची चित्तवृत्ति अस्वस्थ होऊन ते व्याकुळ होतात.

तशा नजरेची वरील मुलाची वृत्ति मलीन नव्हती. आतां एखादा कुशल कारागीर आपल्या मानसिक सृष्टीपुढें एखादें मनोरम चित्र रेखाटून तें चित्रपटावर रंगवून जगाला आश्चर्यचकित् करीत असतो, तशा प्रकारानें दृष्टि ठेवून विचार केला असतां या मुलाची मजल सदर चित्रकारांच्या किती तरी पुढें गेली होती !

सारांश, जें मूळांत शुद्ध, त्याचें पाश्चात्य चिकित्सक पद्धतीनें कितीही संशोधन केलें, तरी तें लंगडें लुलें पडणार; म्हणून सेवक अत्यंत नम्रपणें कोणाही विद्वान डाक्टराला आवाहन करीत आहे कीं, या मुलाच्या डोळ्यांना अथवा मेंदूला अथवा शरीराला काय विकार झाला असावा याचें त्यानें अंशतः तरी लेखकासारख्या अज्ञ मनुष्याला समजवून सांगून त्याचें समाधान करावें.

श्री. नाचणे यांनीं ही हकीकत तीन महिन्यांपूर्वी लेखकाला सांगितली. त्यानें ती तात्काळ लिहून ठेवली, आणि त्या हकीकतीवर आजपर्यंत पाश्चात्य पद्धतीनें चिकित्सा करून लिहितां येईल तर तसें करून पाहावें म्हणून निदिध्यास केला. काय करूं, काय लिहूं, कसें लिहूं, म्हणून पुष्कळ विचार केला. पण जें मुळांत शुद्ध, बुद्ध, त्यावर पाश्चात्य पद्धतीची चिकित्सा करावयास मुळींच वाव मिळेना. म्हणून मनोविकार जाणणाऱ्या डॉक्टरांना सरतेशेवटीं निरुपायानें हें आवाहन देणें भाग पडत आहे.

श्री. बाळासाहेब देव यांजला थोडया दिवसांपूर्वी ही हकीकत सांगितली आणि चिकित्सा करण्यासंबंधानें आज तीन महिने झाले. मति बिलकुल चालत नाहीं म्हणून सांगितलें.

असो. आतां आपल्या अध्यात्म दृष्टीनें विचार करूंया:—या दृष्टीनें पाहतां खरोखरीच संत व श्रीभगवंतांच्या छातीठोक वचनांचा उलगडाच झालेला दिसतो.

हा मुलगा उत्तम दैवी संपत्तिवान् यांत मुळींच संशय नाहीं. श्रीसाईबाबांच्या आशीर्वादाचें फल तें. त्याचें वर्णन कोणत्या शब्दांनीं करावें !

"मी हवा असल्यास अभ्यास करा," "मी तुमच्यापाशींच आहें," "मी हृदयस्थ आहें," "तुमच्या शरीराचा मालीक मी," "शोधा, शोधा, मी दूर नाहीं," "रानावनांत जाणें नलगे," वगैरे कितीतरी छातीठोक वाक्यें स्मृतिपटावर उभीं राहतात. आपण क्षणैक विचार करतों आणि "अगम्य" "अतर्क्य" अशा शब्दांनीं श्रीभगवंताला दूर दूर ढकलीत असतों.

अशा दैवी मुलाचें चरित्र ऐकिलें म्हणजे तात्काळ "काय हो तरी पूर्वजन्मींची त्याची तयारी असली पाहिजे !" असें म्हणून आपण ती पळपुटी वाट पकडीत असतों.

अहो "भक्त्या एकांतिनो मुख्याः" असें देवर्षि नारदमुनि आपल्या दैवी भक्तिसूत्रांत बोलून गेले आहेत; मग आमच्यासारख्या संसारत्रस्त माणसांनीं एकांतवास तो कसा मिळवावा ? आम्ही शहरांत, चाळींत राहणारीं माणसें, कुठला एकांतवास आणि कुठलें काय ?

पाहा, या लहान जीवानें आपणांला काय दाखविलें तें ! चाळींतल्या वस्तींत बापाच्या पथारींत पहांटेच्या शांत वेळीं डोक्यावर पांघरूण घेऊन त्यानें प्रभुप्राप्तीप्रीत्यर्थ एकांत साधला. आम्ही तसें करूं जातां एखादें चिलट गुण-गुण करीत अथवा एखादा ढेंकूण अथवा पिसूं आमच्या एकांताची विल्हेवाट करतें. काय त्या मुलाला ढेंकूण, पिसू, अथवा चिलट यांनीं त्रास दिला नसेल ? जरूर दिला असलाच पाहिजे. पण जेथें श्रीसाईबाबांचे शब्द ऐकण्याची हौस आणि त्याप्रीत्यर्थ चिकाटी आणि तीव्र उत्कंठा, तेथें श्रीसाईबाबांच्या कृपेनें ढेंकून, पिसू अथवा चिलट काय करणार आहेत ?

आतां त्या मुलाच्या साधनांची सिद्धता पाहूं. याविषयींचा दाखला श्रीरामकृष्ण परमहंस यांच्या चरित्रांत व बोलांत उत्तम प्रकारें दिसून येतो. "एखाद्या यात्रेच्या ठिकाणीं जात असतां दुरून एकसारखा घोंगाट ऐकूं येत असतो. जसजसें जवळ जावें तसतसें कांहीं कांहीं अस्पष्ट शब्द ऐकूं येतात. आंत यात्रेंत शिरकाव होतांच, आजूबाजूला पाहिजे तितका घोंगाट चाललेला

असतांनाही ज्या दुकानापाशीं आपलें काम असेल त्या दुकानदाराबरोबर आपण स्पष्ट रीतीनें संभाषण करूं शकतों. "

तोच प्रकार या मुलाच्या साधनांत स्पष्ट दिसून आला. श्रीसाईमाऊली क्रमाक्रमानें त्याचा उत्साह व त्याची जिज्ञासा पाहून त्याच्याबरोबर बोलली. आणि त्याचें अध्यात्मिक कल्याण व्हावें या हेतुनें संदेशांतील श्रीकृष्ण भगवंताच्या मनोहर चित्राकडे त्याचें ध्यान लावून देवाच्या त्या अत्यंत मनोवेधक बाललीलांचा त्या मुलाला अनुभव देवविला.

आतां आपण पुन्हा आपल्या पाश्चात्य चिकित्सक पद्धतिवर येऊं. तुम्हीं म्हणाल कीं, कदाचित् श्री. नाचण्यांच्या येथें अथवा इतर कोठें श्रीभागवताचें पारायण त्या मुलाच्या कानांवरून गेलें असेल, कदाचित् श्री. फाळक्यांच्या चित्रपटांतला खेळ त्या मुलानें पाहिला असेल, अथवा त्या चित्रपटांचें वर्णन अथवा रस्त्यावर चिकटविलेलीं चित्रें (पोस्टर्स) त्यानें पाहिलीं असतील, आणि त्यांचा त्याच्या मनावर परिणाम झाला असेल. क्षणभर आपण तसें झाल्याचें गृहीत धरूंया, तरी चित्रपटांत अथवा श्रीभागवतांत न वर्णन केलेले असे जे देखावे—नित्य नवे असे—तें मूल साक्षात् अनुभवून आपल्या वडिलांस सप्रेमपूर्वक सांगतें त्याचा काय खुलासा ? पाहा पाहा ( mental Therapy ) मानसिक औषधोपचाराच्या पुस्तकांचे व तीं लिहिणाऱ्या प्रख्यात् शास्त्रज्ञांचे आधार मिळल्यास पाहा !

त्याला आधार त्या शास्त्रांत मिळावयाचे नाहीत. श्रीभगवंताच्या श्रीगीतेतल्या जीवंत वचनांत, तसेंच संतांच्या अनुभवशास्त्रांत व श्रीसाईमाउलींच्या शिकवणींत ते आधार तात्काळ मिळतील—नव्हे मिळतात.

आणखी काय लिहावें बरें ! हे दैवी मुला, तुझ्या गोड अनुभवांवरून त्या मार्गानें न जातां केवळ जनमनरंजनार्थ तुझ्या अनुभवांवर चिकित्सा करण्याच्या खोडसाळ वृत्तींत पडलों, याची तूं क्षमा करशीलच करशील अशी

याचना करून, श्रीसाईमाउलीच्या या एका सुंदर लीलेचे यथामति, यथाशक्ति, वर्णन करून हा लेख त्या गोड माउलीच्या पायांपाशीं सद्गदित अंतःकरणानें सादर करीत आहें.

खार,
ता. १२-९-३३

"म्हातारा"

[ २ ]

सान्ताक्रुझ, ता. २-९-३३

श्रीयुत बाबासाहेब यांस, कृ. सा. न. वि. वि. आपण खालील मजकूर श्रीसाईलीला मासिकांत घाल अशी आशा आहे.:—

१९१४ सालच्या पावसाळ्यांतील गोष्ट. मी, माझे स्नेही, त्यांची आई, भगिनी व त्यांचीं मुलें नवस फेडण्याकरितां बाबांच्या दर्शनास गेलों होतों. दोनप्रहरीं मी रजा मागितली व बाबा हंसून म्हणाले, बरें ये. परंतु माझ्या स्नेह्यास म्हणाले कीं, तुम्हीं वाड्यांत राहा. आम्हीं संध्याकाळच्या गाडीकरितां निघालों. टांगे नदींतून कोपरगावांत गेले. परंतु स्टेशनला जातांना मध्यें ओहळ आहे, तेथें एकदम पाण्याचा लोट येण्यास सुरवात झाली व पाणी इतकें चढलें कीं, जर आमचे टांगे त्या पुलावर असते, तर जरूर पाण्याच्या जोरानें खालीं गेले असते. परंतु श्रीबाबांची कृपा, म्हणून बचावलों व आम्हीं संध्याकाळपर्यंत तेथें मजा पाहत राहिलों. कारण पलीकडे जाण्यास दुसरा मार्ग नव्हता, व संध्याकाळची गाडी मिळेना; टांगेवाले म्हणूं लागले कीं, तुम्हीं आतां मारुतीच्या देवळांत राहा व पाणी उतरलें कीं रात्रीं १ वाजतांच्या गाडीनें जा. त्याप्रमाणें आम्हीं देवळांत वेळ काढला व रात्रीं ११ वाजतां परत टांग्यात बसलों व त्या ओढ्यावरून जातांना गावकऱ्यानें एक

टांगा आमच्या टांग्यांच्या मध्यें घातला व मजा अशी झाली कीं; आमचा एक टांगा पसार झाला. दुसरा टांगा गांवकऱ्याचा होता. त्याचे घोडे सुटले व टांगा मोडला. टांग्यांत दोन मुसलमान होते ते उड्या मारून खालीं उतरले व घोड्यांना धरलें. ह्या वेळीं तिसरा टांगा आमचा होता व चवथ्यामध्यें मी व माझे एक परदेशी स्नेही होतों. आम्हांला वाटलें कीं, पहिलाच टांगा मोडला (कारण आमचा टांगा फार लांब दूरवर होता.) व बायका मंडळींना त्रास झाला असेल. म्हणून आम्हीं एकदम खालीं उतरलों व आमचे परदेशी स्नेही कपडे काढून पुढें धांवत गेलों तेव्हां मुसलमान उतारूंपैकीं एकजण म्हणाला कीं घाबरूं नका. तुमचा पहिला टांगा पसार झाला आहे (ती रात्र अंधारी असल्यामुळें आम्हांला नीट दिसत नव्हतें.) तेव्हां आम्हांला धीर आला व बाबांच्या लीलेबद्दल आश्चर्यचकित झालों. गाडीला अवकाश होता. जरा वेळानें कै. नानासाहेब चांदोरकर स्टेशनवर आले. आम्ही सर्व हकीकत त्यांना सांगितली. तेव्हां ते म्हणाले कीं, माझाही बेत संध्याकाळच्या गाडीनें जाण्याचा होता. परंतु बाबांनीं परवानगी दिली नाहीं व आतां मी ओहोळावरून आलों; परंतु बिलकुल पुलावर पाणी नव्हतें व बैलांच्या खुरां-नाही पाणी लागलें नाहीं. नंतर आम्ही सर्व एकाच गाडीनें मुंबईस आलों. ते कल्याण स्टेशनला उतरले. गाडींत मीं त्यांना मला कांहीं अनुभव आले असल्याचें सांगितलें व आज असें कां झालें म्हणून मीं त्यांना विचारलें, तेव्हां ते म्हणाले कीं, बाबांची लीला अगाध आहे, व तुम्हीं बाबांची एकनिष्ठपणें सेवा कराल तर कितीही संकटें आलीं, तरी बाबा तुम्हांला संकटांतून पार पाडतीलच. हें कै. नानासाहेबांचें म्हणणें खरें ठरलेंच आहे. मला बरेच अनुभव आले आहेत व ज्याप्रमाणें बाबा प्रेरणा करतील, त्याप्रमाणें आपणाकडे वेड्यावांकड्या शब्दांत पाठवीत जाईन.

आपला,
साईभक्तांचा दासानुदास
**साईदास**

सान्ताक्रुझ,
२-९-३३

## श्रीसाईबाबा प्रसन्न

सान्ताक्रुझ, ता. २५-८-३३

श्रीयुत साईलीला संपादक महाशय यांस, कृ. शि. सा. नमस्कार विनंती विशेष.

आज रोजीं आपला श्रीसाईलीला अंक ६, वर्ष १० वें, भाद्रपद शके १८५५, सर्व वाचून झाला. माझ्या मनाला नेहमीं श्रीबाबांबद्दलचे अनुभव वाचून फारच आनंद होतो. त्यांत मोठें कौतुक करावयाचें म्हणजे श्रीयुत बाबांचें बाळ व श्रीयुत म्हातारा ह्या श्रीसाईबाबांच्या भक्तांचे होय. कारण त्यांची श्रीसाईबाबांच्या ठायीं किती भक्ति आहे व श्रींच्या ठायीं भक्ति आहे अशा मंडळीकडून माहिती मिळवून ती साईलीलेंत प्रसिद्ध करावयाची एवढेंच नसून, संस्थानची केवढी जोखमदारी घेतली आहे व आपला बहुतेक वेळ त्यांतच घालवितात. खुद्द श्रीयुत म्हातारा ( श्री. बाबासाहेब तर्खड, B. Sc.) ह्यांनीं ट्रस्टीमधून स्वखुशीनें राजीनामा देवून खजिनदाराची दगदगीची जागा पत्करली व श्रीयुत बाबांचे बाळ ( श्री. बाळासाहेब देव, B. A., रिटायर्ड मॅजिस्ट्रेट ) ह्यांनीं कै. चिंचणकर यांच्या केसपैकीं संस्थानकरितां काय काय त्रास सोसावा लागत आहे हें होय, व नाटकाची सोई करून संस्थानकरितां फंड गोळा केला.

आतां श्रीबाबांचें बाळ यांचे अनुभव लेखांच्या बाबतींत वाचणाऱ्याचा थोडा गैरसमज होईलसें वाटतें; तो न व्हावा यांकरितां हा खुलासा करीत आहें. गुरुपौर्णिमेस भक्तडमंळी श्रींची पूजा करून, गुरुपौर्णिमेचा उत्सव साजरा करीत. ता. २३-७-१८ रोजीं गुरुपौर्णिमा होती. त्या दिवशीं पूजाअर्चा झाल्यावर संध्याकाळीं श्रीबाबा मशिदींत बसले व रथाची मिरवणूक पहिल्याचप्रथम काढण्याची भक्तमंडळीला परवानगी दिली. रथांत श्रीबाबांची तसबीर ठेवली, त्या वेळीं रथापुढें कै. भगत हे होते. त्या वेळीं पुष्कळ मंडळी लांबून आली होती. त्यांत माझ्या माहितीपैकीं मुंबईचे कै. काकासाहेब दीक्षित, श्री. काका महाजनी

रा. ब. मो. वि. प्रधान, रा. सुंदरराव नवलकर सहकुटुंब, रा. गणपतराव मो. कोठारे सहकुटुंब, रा. लिमये व कै. शेट जहांगिरजी पटेल (जो बाबांच्या विरुद्ध होता; तो श्री. लिमयेजवळ बाबांविषयीं वाईट बोलत असे.) हे दोघेही प्रथमच शिरडीस आले होते. ह्या दोघांसंबंधीं हकीकत मागील मासिकांत आलेली आहे. ह्या मिरवणुकींत मीही स्वतः होतों. ह्यावरून हा उत्सव श्रीबाबा असतांनाच सुरू होता व हाच त्यांच्या हयातींतील शेवटला उत्सव झाला. आपण पान २० मध्यें दिलेल्या माहितींत श्रीबाबांच्या हयातींत फक्त रामनवमीचाच उत्सव होत असे, असें लिहिलें आहे; पण हाही उत्सव त्यांच्या हयातीपासून चालू आहे. त्याचप्रमाणें रामनवमीचा उत्सव हल्लीं ह. भ. प. दासगणू याजकडे आहे.

सान्ताक्रुझ, ५-९-३३ } आपला साईभक्तांचा नम्र सेवक
**साईदास**

# [ ३ ]

## ॥ श्रीसाईनाथ प्रसन्न ॥

## आमचा शिर्डीचा परत प्रवास व बाबांना भक्तांची कळकळ

मी यापूर्वी तीन वेळां बाबांच्या समाधीचें दर्शन घेण्याकरितां श्रीक्षेत्र शिर्डी येथें गेलो होतों. परंतु उत्सवाच्या वेळीं होणारा समारंभ व त्या वेळीं येणाऱ्या भक्तांची भेट व्हावी म्हणून जावें, असें फार दिवसांपासून मनांत होतें; तरी दोन दिवसांची सुटी घेऊन सर्व मुलांबाळांसह गेल्या पुण्यतिथीच्या होणाऱ्या उत्सवास गेलों. निघण्याच्या पूर्वी तेथें आपली उतरण्याची वगैरे सोय

होईल किंवा नाहीं याबद्दल बरीचशी काळजी होती. परंतु तेथें जातांक्षणींच देवाचें दर्शन झालें. मग काय, देवच ते ! त्यांनीं लागलीच आम्हांला आपल्या पदरांत घेऊन आमची घरच्यापेक्षां सर्व तऱ्हेची उत्तम सोय करून दिली व तो व दुसरा दिवस सर्वांच्या सहवासांत फारच आनंदांत गेला. परंतु सुटी जास्त नसल्यामुळें दुसऱ्या दिवशीं सायंकाळीं निघणें अगदीं जरूर होतें व मोटरींत त्याच दिवशीं आम्हां १२ इसमांस जाण्यास सांपडणार नाहीं हें भविष्य ठरूनच आगाऊ दोन बैलगाड्या सायंकाळीं ४ वाजल्यापासून समाधी-जवळ आणून ठेवल्या होत्या. सायंकाळीं ४ वाजल्यापासून थोडा थोडा पाऊस सुरू झाला व पांच वाजतां त्याला बराच जोर आला. तीन वाजतां कोपरगांवा-कडून श्रीबाबांच्या दर्शनास आलेल्या इसमानें सांगितलें कीं, नदीला आधींच पाणी फार आहे, व या पावसानें पाणी जास्त चढून गाडी पलीकडे जाणें शक्य नाहीं; तरी लौकर निघून दिवसाउजेडीं नदीपर्यंत पोंहचल्यास नावेनें पलीकडे जाण्यास सांपडेल. असें म्हणून आम्ही सर्वांनीं आपलें सामान गाडींत ठेवून मुलांना बसविलें व मी देवाचा निरोप घेण्याकरितां गेलों. इतक्यांत पावसास जास्तच जोर चढून आम्ही कोपरगांव मार्गानें जावें किंवा नाहीं हा सर्वांना विचार पडला. नंतर रा. माधवराव देशपांडे यांच्या सूचनेवरून चितळी मार्गानें जावें असें ठरलें. परंतु पावसामुळें त्या मार्गानें तरी वेळेवर पोंहचतां येईल किंवा नाहीं अशी मला शंका वाटूं लागली. हा विचार मनांत येतो तोंच कोपरगांवाकडे जात असलेली एक मोटर लोकांना दिसली; परंतु अशा पावसांत त्या मोटरीस थांबत जाऊन सांगणार कोण व त्यांत सर्वांची सोय होते किंवा नाहीं, अशी सर्व काळजी माझ्यापुढें येऊन ठेपली; परंतु बाबांची लीला कांहीं अगाध ! तेथें कोणाचें चालणार ? रा. सावंत फौजदार हे सायंकाळीं कोपरगांव रस्त्याकडे फिरावयास गेले होते, व आमचा बैल-गाडीनें जाण्याचा विचार व आलेल्या बैलगाड्याही त्यांनीं पाहिल्या होत्या. असें असूनही त्यांनीं कोपरगावांकडे जाणारी मोटर वाटेंत थांबवून मोटार समाधीकडे घेऊन जा असें ड्रायव्हर यास सांगून मोटर पाठवून दिली. आमचे

दीक्षीतांच्या माडीवर चितळी मार्गानें जाण्याचें ठरतें, तोंच पों पों करीत मोटर समाधीशीं येऊन ठेपली आणि पाहतो तों ती बहुतेक रिकामीच ! मग काय विचारतां ? आम्हीं लागलीच सर्व सामान व मुलांना उतरवून मोटरींत श्री. काकासाहेब देव यांची आज्ञा घेऊन बसलों.आमची मोटर १० मिनिटांच्या रस्त्यावर येते तोंच पाउस अजिबात बंद झाला व थोड्याच वेळांत आम्हीं गोदावरीच्या शिर्डी तीरावर येऊन उतरलों.कारण पाणी फार असल्यामुळें मोटर नदीपलीकडे जाणें शक्य नव्हतें. आमच्या बरोबरचे ठाण्याचे श्रीयुत बाबुराव देव वकील व त्यांचे बंधु रा. भय्यासाहेब हे पुढें नावेची व्यवस्था करण्याकरितां गेले. परंतु अंधार पडल्यामुळें कायद्याप्रमाणें नाव सोडतां येत नाहीं.असें सांगून नावेकऱ्यांनीं आमचा मार्ग खुंटविला. आमच्याजवळ सामान फार, मुलें लहान, गोदावरीस पाणी तर मांडीपेक्षां जास्त. सामान व मुलें नेण्यास मनुष्य नाहीं, अंधार जास्त होत चालला, जवळपास कोणाचा आश्रय घेऊं तर ठिकाणें नाहीं. आतां अशा स्थितींत काय करावें, ह्याचा सर्वांपेक्षां मलाच विचार पडला. नंतर सर्वांनी विचार करून असें ठरविलें कीं, एक वेळ सर्वांनीं डोक्यावर सामान नेऊन ठेवून परत यावें, पुन्हा येऊन मुलांना घेऊन जावें. असें ठरल्यावर श्रीसाईबाबांच्या नांवाचा जयघोष करून पाण्यांत पाय ठेवले व त्यांच्याच नांवाची घोषणा करीत एकमेकाचे हात धरून व एकमेकांना धीर देत जेमतेम नदीच्या मध्य भागावर आलों. पाणी चढत असल्यामुळें बायकांच्या मांडीवर पाणी चढून सर्व वस्त्रें कंबरेपर्यंत ओलीं होऊन पाण्याच्या भयंकर ओढीनें बायकांचे पाय लटपटून आपला मार्ग सोडूं लागले व श्रीगोदावरीमाता आम्हांपैकीं कांहींना आपल्या पदरांत घेते कीं काय अशी भीति वाटूं लागली. पण जेथें ही सर्व बाबांची लीला ! तेथें कोण काय करणार. तरी अशा रीतीनें बाबांच्या नांवाचा घोष करीत आम्ही सर्वजण कोपरगांवकडील तीरावर मुलें व सामानसह सुखरूप पोहचलों व ओलीं वस्त्रें बदलून टांग्यानें स्टेशनवर सुमारें ९ वाजतां येऊन पोहचलों. आमच्या गाडीला २ तास वेळ होता. तरी हा वेळ कसा घालवावयाचा याची चर्चा सुरू झाली. कोणी म्हणे बीज,

तर कोणी बिझीक, तर कोणी केरम व कोणी म्हणे भजन सर्वांत उत्तम. पण शेवटच्या प्रोग्रामास सामान कोणाजवळ ? मी सहज तेथील स्टेशनमास्तर यांस भजनाची इच्छा दर्शविली व लागलीच 'मजजवळ सर्व माझीं स्वतःची हत्यारें आहेत,' असें म्हणून सर्व व्यवस्था करितों असें सांगून दिवाबत्तीसुद्धा एका मोठ्या खोलींत लागलीच सर्व तयारी केली. आमच्यापैकीं ठाण्याचे देव वकील व डॉक्टर हे बाजविण्यांत फारच तरबेज होते व गाणारे कोण,तर श्री. शांताराम तेलंग; मग काय विचारतां? सर्वच तरबेज ! आमच्या पेटी-तबल्याचा गाड, मंजुळ आवाज निघतांच सभोंवतालच्या मंडळींची मुंग्यांसारखी गर्दी जमली. नंतर श्री काकासाहेब देव यांनीं बाबांची पूर्वस्थिति वर्णन केलेली मधुर काव्यें गाऊन गाडी येण्याच्या सुमारास भजन समाप्त केलें. नतंर तेथील स्टेशनमास्तरनें दिलेल्या प्रेमळ काफीपेयाचा स्वीकार करून त्यांचा निरोप घेऊन आम्ही सर्वजण आपआपल्या घरीं येऊन सुखरूप पोहचलों. वरील हकीकतीवरून श्रीसाईमाउलीला आपल्या भक्तांना सुखरूप घरीं पोहचविण्याची कळकळ व जबाबदारी किती असते हें सिद्ध होत नाहीं काय ?

सान्ताक्रूझ
२-९-३३

"साईदास"

श्रीसाईनाथप्रसन्न

# बाबांनीं स्वप्नांत दिलेली भेट खरी ठरली

## तारीख १ जानेवारी सन १९३३ रोजीं पहांटे ४॥ वाजतां दिसलेलें स्वप्न

"माझ्या वरिष्ठांकडून लाइनवर जाऊन त्याच दिवशीं सायंकाळीं परत येण्याकरितां मला हुकुम झाला आहे. ज्या ठिकाणीं जावयाचें होतें त्या ठिकाणाहून सायंकाळीं परत येणें अगदीं अशक्य होतें. पण अशी स्थिति असतां देखील अधिकाऱ्याचा हुकुम त्या वेळीं स्पष्ट रीतीनें मोडणें मला अशक्य झालें. तरी सर्व तयारी करून मीं जाण्यास निघालों व आगगाडींत बसलों. परंतु सायंकाळीं परत कसें येतां येईल, याविषयीं काळजी लागली. गाडी चालू झाली व ती एका नदीकडे जात आहे, इतक्यांत मीं गाडींतील लोकांना विचारलें कीं, हें ठिकाण कोणचें? तरी हें कोपरगांव असें मला उत्तर मिळालें व मीं त्यांना म्हटलें कीं, मीं शिरडीस बाबांच्या दर्शनास जाण्याचा निश्चय केला आहे. आणि गाडी तर थांबत नाहीं! तरी कसें काय करावें? इतक्यांत गाडी नदीच्या पलीकडे गेली व येथें उजव्या बाजूस एक मोठा चिरेबंदी चौथरा असून एका झाडाखालीं बाबा व एक मोठा वाघ असलेले दिसले. गाडींतील लोकांशीं बोलत असतां त्यांनीं मला असें सांगितलें कीं, ज्या इसमावर बाबांचें प्रेम असतें, त्यास हा वाघ हात लावूं देतो. इतक्यांत गाडी थांबवून मीं खालीं उतरलों व चौथऱ्यावर गेलों. तेथें एक ट्रॉली (रुळांवरून ढकलण्याचें गाडीस) आहे. मीं त्यांत बसलों व हातानें ढकलीत ढकलीत वाघाच्या वाघाच्या त्या वाघाच्या अंगावरून हात फिरविला, परंतु त्यानें हूं सुद्धा केलें नाहीं! नंतर मीं ट्रॉलींतून खालीं उतरलों व कपडे काढून बाबांना नमस्कार केला. नंतर या चौथऱ्याच्या भिंतीतील गाभाऱ्यांत एक शंकराची पिंडी आहे, तिच्या दर्शनास जाण्यास निघालों. खालीं जाण्याच्या पायऱ्या उतरत असतां आंतून एक

मुलगी वर चढत येत असतांना दिसली व तिला मीं बाबांना देण्याकरितां खिशांतून रुपया आणण्याकरितां सांगितलें. परंतु दक्षिणेची जरूर नाहीं असें सांगून ती पुढें चालती झाली. नंतर मी परत जाऊन रुपया घेऊन आंत शिरतों, तोंच त्या ठिकाणीं तीन मोठाले वाघ बसले आहेत असें दिसलें व ते पाहून मनास अतिशय भीति वाटली तरी देखील, धाडस करून मी त्यांना चांगलें गोंजारलें. तेथें असलेल्या शंकराच्या पिंडीस बाबा, बाबा, बाबा, म्हणून साष्टांग नमस्कार घालून उभा राहतों तों त्या तीन वाघांपैकीं एकाचें रूपांतर एका पांढरे कपडे घातलेल्या साहेबांत झालें व तो माझी पाट थोपटून म्हणाला कीं, तुला कोणाची भीति नाहीं. नंतर मी वर जाण्यास निघालों व जिना चढून वर येतों तों दरवाजांत माझ्याकरितां बाबा उभे आहेत व मी त्यांना बाबा, बाबा, म्हणून गहिवरानें कडकडून भेटलों व त्यांनीं माझ्या अंगावर हात फिरवून सांगितलें कीं 'बेटा, डरो मत्' 'तुमको किसीकाभी डर नहीं.' नंतर मी वर येऊन कपडे घालून घरीं येण्याकरितां बाबांची आज्ञा मागितली. त्या ठिकाणीं पुष्कळ मंडळींचें जेवण चाललें होतें. त्यापैकीं एका बाईस बाबांनीं हाक मारून सांगितलें कीं, हे परत जात आहेत, व त्यांच्याबरोबर त्यांचा मुलगा आहे. तरी त्यांना रस्त्यांत फराळाचें व प्रसाद द्या. असें म्हटल्यावर मी प्रसाद व फराळाचें घेऊन बाबांचा निरोप घेतला." यासंबंधानें पुढें घडलेली हकीगत.

एकाएकीं जानेवारीच्या तीसऱ्या आठवड्यांत येथील ऑफिसचे मुख्य कारकून यांची मुंबईच्या मोठ्या ऑफिसांत बदली होण्यासंबंधानें Demy official correspondance सुरू झालें व या arrangement मध्यें होणाऱ्या जागा Seniority प्रमाणें ठरवावयाचें ठरलें. वास्तविक घडामोडींत होणारी नंबर दोनची जागा मलाच मिळावयास पाहिजे होती. कारण अशा जागेंत मीं पूर्वीं ६ महिने काम केलें होतें. परंतु वेळोवेळीं निघणाऱ्या कायद्यांतील शब्दांचा कीस काढून व त्याचा अर्थ अधिकाऱ्यास पटवून माझी Seniority एक नंबरनें खालीं आली व अशा परिस्थितींत मीं अगदीं निराश

झालों. माझी बाजू मीं येथील मुख्याधिकाऱ्यापुढें सर्व रीतीनें मांडली, पण त्याचें समाधान होईना. नंतर शेवटीं न्याय मिळण्याकरितां माझे कागद मुंबईस असलेल्या मुख्य ऑफिसांत पाठविण्याची विनंति मान्य केली. त्या सुमारास मला अनायासें मुंबईस आठ दिवस राहण्याचा फायदा मिळाला व त्या संधींत मीं आपली सर्व हकीकत तेथील पांढरे कपडे घालणाऱ्या European साहेबास समजावून सांगितली व त्यांनीं मला आश्वासन देऊन ठीक आहे, you can go now, I will see it through असें सांगून ६-७ दिवसांत माझ्यातर्फे निकाल होऊन मी आज त्या जागेंत ६ महिन्यापासून काम करीत आहें; यावरून पुढें होणारें भविष्य बाबा आपल्या भक्तास कशा रीतीनें कळवितात हें सिद्ध होत नाहीं काय ? काय ही त्यांची लीला !

भुसावळ, ता.
१६-८-३३.

साईदास

॥ श्रीराम जयराम जयजयराम ॥

# श्री. साठेसाहेबांचा वाडा श्री. नवलकरांचा होण्यास पाया केव्हां व कसा घातला गेला ?

एकदा गुरुपौर्णिमेच्या उत्सवास श्रीरामकृष्ण श्रीकृष्ण नवलकर हे त्यांच्या श्री. आनंदराव शामराव प्रभाकर नांवाच्या बाबांच्या जुन्या भक्तांपैकी एका मित्रासह शिर्डीत आले व काकासाहेब दीक्षितांच्या वाड्यांत ( दीक्षित हयात असतांना ) वरील दिवाणखान्यांत दोघांचें सामान ठेवून स्नान वगैरे करण्यास गेले. ते आपले विधि आटपून परत दीक्षितांच्या वाड्यांत शिरतांच त्यांनीं आपले वर ठेवलेले बिछाईत वगैरे खालीं उघड्या ओटीवर ठेविलेले पाहिले. हा प्रकार पाहतांच त्या नवलकर प्रभाकरांनीं एक भाड्याची खोली जवळपास घेऊन तेथें सामान ठेऊन बाबांच्या दर्शनास ते गेले. तेथें काका-साहेब दीक्षित होते. पण त्यांना वरील हकीकत ठाऊक नव्हती. नवलकरांना गेल्याबरोबर बाबा विचारतात, “ काय रे तुला राह्याला जागा मिळाली कीं नाहीं ?” नवलकर म्हणाले, “होय बाबा, आपल्या कृपेनें आमची उतरण्याची तजवीज झाली आहे.” कांहीं काळ लोटल्यावर श्री. साठ्यांचा वाडा श्री. दीक्षितांच्या साहनुभूतीनें नवलकरांनीं विकत घेतला, तेव्हां नवलकरांचें वरील-प्रमाणें सामान त्यांच्या पश्चात व दीक्षितांच्या अपरोक्ष खालीं रवाना केलेलें, व त्या वेळेस नवलकरांचें खिन्न झालेलें मन, व लगेच बाबांचा प्रश्न “काय रे, तुला राह्यला जागा मिळाली कीं नाहीं ?” ह्याची आठवण होऊन, श्री. नवलकरांना बाबांच्या लीलेचें कौतुक कसें करावें व कितीं करावें हेंच समजत नाहीं.

परम कृपाळू माउली पुढें काळांतरीं होणाऱ्या गोष्टींचे कसे अचुक व योग्य वेळेवर सुतउवाच करीत असत, ह्याच्या अगणित दाखल्यांपैकीं वरील एक स्पष्ट दाखला आहे.

वरील हकीकत एका सन्माननीय मित्राकडून मिळाली आहे.

खार. ता. १०-९-३३

—संपादक

श्रीदत्तचित्साईसद्‌गुरुभ्योनमः

# भक्तश्रेष्ठ कै. दामोदर घनःश्याम ऊर्फ आण्णा चिंचणकर यांनीं केलेल्या मृत्युपत्रांतील अटींसंबंधानें केलेल्या अर्जाच्या अखेर निकालाची हकीकत

व

## बेर्‍हें गांवच्या जमिनींत जमिनीच्या हक्काच्या दाव्याची हकीकत व शेवटचा निकाल

**श्री साईलीला संपादक महाशय यांस,**

सप्रेम कृतानेक शि. सा. नमस्कार विनंती विशेष. कै. श्रीयुत दामोदर घन:शाम बाबरे ऊर्फ आण्णा चिंचणकर यांच्या मृत्युपत्रांतील अटींसंबंधानें ठाणें डिस्ट्रिक्ट कोर्टांत ता. ५-११-२९ रोजीं दाखल केलेल्या अर्जाचा अखेर निकाल आमच्याविरुद्ध त्या कोर्टानें ता. २६-६-३० रोजीं दिला. त्यानंतर त्या निकालाविरुद्ध नामदार मुंबई हायकोर्टांत आम्ही रिव्हिजन अर्ज देण्याचें ठरवून ता. २५-७-३० रोजीं कागदपत्र वकिलास दाखविले. ता. २७-७-३० व २९-७-३० रोजीं कागदपत्र वकिलांच्या हवालीं केले. ता. ३१-७-३० रोजीं कागदांच्या नकला करण्याकरितां स्टँपाकरितां व अशाच इतर कामाकरितां वकिलांच्या कारकुनाकडे पैसे भरले. नंतर ता. १-८-३० रोजीं आमचा म्हणजे आण्णा चिंचणकरांच्या विश्वस्तांचा व ता. २-८-३० रोजीं शिरडी संस्थानचे विश्वस्तांचा असे दोन निरनिराळे अर्ज दोन निरनिराळ्या वकिलांमार्फत दाखल झाले. येथपर्यंतची साद्यंत हकीकत श्रीसाईलीला मासिक वर्ष ७, जोड अंक ९-१०-११ यांत पूर्वींच दिली आहे.

आतां यापुढील हकीकत म्हणजे नामदार हायकोर्टांत आमच्या अर्जाच्या सुनावणीची अखेर तारीख निघेपर्यंत मध्यंतरी किती तारखा पडल्या, किंवा किती तारखेस सुनावणीची तारीख केव्हां लागते, ह्याची चौकशी करण्या-

करितां मुंबईस हेलपाटे मारावे लागले, ही होय. ४-८-३०, ११-८-३०, २३-८-३०, १-९-३०, ५-११-३०, २-१२-३०, ७-१-३१, २-४-३१, ७-४-३१, १०-४-३१, इतक्या तारखेस हेलपाटे मारून शेवटीं ता. १७-८-३१ ही सुनावणीची तारीख ठरली. म्हणजे आमच्या अर्जाचा नंबर व तारीख बोर्डावर लागली. परंतु त्या तारखेस आमचा अर्ज निघालाच नाहींत. मी श्री. बाबासाहेब तर्खड व रा. ब. मोरेश्वरराव प्रधान परत आलों. दुसऱ्या व तिसऱ्या म्हणजे १८-८-३० व १९-८-३० तारखेसही तसेंच झालें. ता. २०-८-३० रोजीं आमच्या अर्जाचा निकाल झाला. हायकोर्टांनीं खालच्या कोर्टाचा हुकुम रद्द केला व खर्चाचा हुकुम करण्याकरितां तें काम पुन्हा ठाणे डिस्ट्रिक्ट कोर्टांत परत पाठविलें. जरूर तर आम्ही (आण्णाच्या ट्रस्टांनीं) आमचें काय म्हणणें आहे हें स्पष्ट शब्दांत लिहून पुन्हा अर्ज द्यावा असें फर्माविलें.

अर्जाच्या अपरिपक्वतेबद्दल, अस्पष्टतेबद्दल व अर्जांत लिहिलेल्या गोष्टींपैकीं कांहीं गोष्टींच्या अप्रयोजकतेबद्दल नामदार जज्जसाहेबांनीं निकालांत विश्वस्तांवर बरीच टीका केली आहे. कांहीं वर्षे हायकोर्ट जज्जाच्या जागेवर काम केलेल्या श्री. रा. रा. गणपत सदाशिवराव राव वगैरे सन्मान्य विद्वान व कायदाविशारद सद्गृहस्थास जो अर्ज परिपक्व, स्पष्ट व प्रयोजक वाटला, व जो ठाणे डिस्ट्रिक्ट कोर्टाचे श्री. विद्वान व कायदेपंडित जज्जसाहेबांनीं घेऊन त्याचा निकाल केला तोच अर्ज नामदार कोर्टास अपरिपक्व, अस्पष्ट व अप्रयोजक वाटतो, म्हणजे हा तरी एक बाबांच्या उलट लीलेचा खेळ आहे व त्याच अर्जाचा निकाल आमच्या बाजूचा होणें हा बाबांच्या लीलेचा सुलट खेळ आहे, असें म्हणावें लागतें. असो.

ठाणें डिस्ट्रिक्ट कोर्टांत बऱ्याच तारखा लागून अखेर ता. २०-६-३२ रोजीं आमच्या अनुमानाप्रमाणें हायकोर्टाच्या टीकेस अनुसरून, कांहीं विनोद करून, कांहीं सहानुभूति दाखवून, शेवटीं खर्च विश्वस्तांनीं सोसावा असा

पूर्वनिर्णित निकाल डिस्ट्रिक्ट कोर्टाच्या जज्जसाहेबांनीं देऊन फार दिवस रेंगाळत पडलेलें काम निकालांत काढलें.

असो. डिस्ट्रिक्ट कोर्टांनीं दिलेला निकाल विचित्र, विक्षलण, व विपरीत होता. तो कोणाही निःपक्षपाती गृहस्थास पटण्यासारखा नव्हता व हायकोर्टांतही टिकणें शक्य नव्हता. तथापि विरुद्ध बाजू त्या निकालानें फारच हुरळून गेली होती. आपण आमच्यावर मात करून यशाचें शेवटचें स्वर्गीय शिखर गांठलें, असें तिला वाटूं लागलें. आमचे स्नेही श्रीयुत केशवराव ऊर्फ आप्पासाहेब पाध्ये विरुद्ध बाजूचे वकील, हायकोर्टांत काय निकाल होईल ह्याची जाणीव असतांनासुद्धा त्यांच्या धंद्याच्या पद्धतीस अनुसरून आम्हास उपदेश करूं लागले कीं, 'रावसाहेब, झालें हें चांगलें झालें. हायकोर्टांत जाऊन तुम्हांस जास्त काय मिळणार! तुम्ही अपिलाचा नाद सोडून द्या.' वास्तविक पाहतां विरुद्ध बाजूचा या कामांत अर्थाअर्थी कांहीं संबंध नव्हता व नाहीं. आण्णांनीं मृत्युपत्र केलें तें विलेंपालें येथें केलें. विश्वस्त नेमले, ते सर्व बाहेर गांवचे व बाबांचे भक्त. त्यांत चिंचणी गांवकऱ्यांपैकीं किंवा स्वतः त्यांच्या जवळच्या अगर त्यांच्या नातेवाइकांपैकीं अगर इष्टमित्रांपैकीं कोणाचेंही नांव नाहीं. तसेंच चिंचणीस बाबांचें जें मंदिर बांधावयाचें, तें व त्यास जोडून बाबांच्या भक्तांच्या सोईकरितां जी धर्मशाळा बांधावयाची ती ह्या दोन्ही इमारती खासगी समजल्या जातील व ह्या इमारतींच्या व्यवस्थेचे सर्व हक्क आपण आपल्या विश्वस्तांस दिले आहेत असें स्पष्ट लिहिलें आहे. यावरून पुढेंमागें होणाऱ्या वरील दोन इमारती सार्वजनिक नव्हत, खासगी होत. यामुळें गांवकरी लोकांचा अगर विरुद्ध बाजूंतील लोकांचा कसल्याच प्रकारचा संबंध येत नाहीं.

परंतु न्यायकोर्टांत कित्येक वेळीं अगदीं अनपेक्षित प्रकार घडतात. डिस्ट्रिक्ट कोर्टानें दिलेला विचित्र निकाल हा त्यापैकींच एक मासला होता.

आपल्या मिळकतीच्या उत्पन्नापैकीं दरसाल तीन चतुर्थांश उत्पन्न आपल्या विश्वस्तांनीं बाबांच्या समाधीच्या नित्यनैमित्तिक पूजेअर्चेच्या खर्चाकरितां शिरडी संस्थानच्या व्यवस्थापकांकडे देत जावें, बाबांचें मंदिर चिंचणीस

बांधावें. त्यांत बाबांची मूर्ति स्थापन करून तिच्या नित्यनैमित्तिक खर्चाकरितां आपल्या मिळकतीच्या वार्षिक उत्पन्नापैकीं राहिलेला एक चतुर्थांश भाग खर्च करावा, अशी इच्छा मयतांनीं आपल्या मृत्युपत्रांत प्रकट केली आहे. चिंचणीस देवांचीं मंदिरें पुष्कळ आहेत व त्यांचीच नीट व्यवस्था होत नाही. त्या देवमंदिरांची ही दशा! मग आणखी एक संतांचें मंदिर बांधून त्यांत अनवस्थेचीच भर घालण्यांत काय मतलब? शिवाय चिंचणीस अगर आजूबाजूच्या गांवीं बाबांचा भक्त कोणीच नाहीं. म्हणून ही मंदिराची व धर्मशाळेची अट काढून टाकून शिल्लक राहिलेलें एक चतुर्थांश उत्पन्न बाबांच्या पुण्यसमाधीकडेच शिरडीस खर्च करण्याची परवानगी विश्वस्तांस द्यावी असा विश्वस्तांचा ठाणे डिस्ट्रिक्ट कोर्टास मुळचा अर्ज होता.

आपल्या उत्पन्नापैकीं प्रत्येक पै बाबांकडेच खर्च झाली पाहिजे असाही स्पष्ट उल्लेख मृत्युपत्रांत आहे.

धार्मिक कामांत एक पैही खर्च होऊं नये असें त्या वेळीं ठाणे डिस्ट्रिक्ट कोर्टांत असलेल्या जज्जसाहेबांचें मत.

मयताच्या इच्छेपुढें कोर्टाचें मत काय उपयोगी पडणार! कोर्टाचें मत कीं, हें सर्व उत्पन्न शिक्षणाकडे खर्च व्हावें. चिंचणीस बाबांचें मंदिर व धर्मशाळा बांधावी असें कोर्टाचें व विरुद्ध बाजूचें मत पहिल्यापासून नव्हतें. विरुद्ध बाजूची इच्छा कीं, हें उत्पन्न चिंचणीतील मुलांच्या शिक्षणाकडे किंवा तारापूरच्या सूतिकागृहाकडे खर्च व्हावें. माझे स्नेही श्रीशेट नरसीलाल हरीलाल, राहणार चिंचणी यांचे थोरले चिरंजीव शेट ब्रजलाल ह्यांची इच्छा कीं, या उत्पन्नापैकीं कांहीं भाग चिंचणीस स्थापन केलेल्या हायस्कुलांत खर्च व्हावा.

परंतु हा सर्व प्रकार "बनिया देत नाही, पुरा तोल" या म्हणीप्रमाणें होता. चिंचणीस बाबांच्या मंदिर व धर्मशाळाखर्चासाठीं हें उत्पन्न खर्च करावें. दुसऱ्या इतर कोणत्याही कामाकरितां खर्च करूं नये, व मंदिर व धर्मशाळा ही खासगी मिळकत समजावी, असा स्पष्ट उल्लेख व स्पष्ट आज्ञा

मृत्युपत्रांत असतां जज्जसाहेबांच्या मतास किंवा विरुद्ध बाजूच्या इच्छेस अगर सूचनेस वाव मिळावा कसा? तथापि सत्ता ही वस्तु कांहीं और आहे व याच सत्तेच्या जोरावर " अथ केन प्रयुक्तोयं पापं चरति पूरुषः अनिच्छन्नपि वार्ष्णेय बलादिव नियोजितः" या श्रीमद्भगवद्गीतेंतील तिसऱ्या अध्यायांतील ३६ व्या श्लोकांत भक्तश्रेष्ठ अर्जुनानें जगद्गुरु श्रीकृष्ण परमात्मास प्रश्न केल्याप्रमाणें आपली इच्छा किंवा आपलें मत दुसऱ्याची इच्छा नसतांही त्यावर लादतां येतें.

सर्व उत्पन्न शिक्षणाकडे खर्च करावें असा कोर्टाचा कल पाहिल्यावर आम्हीं कोर्टास कळविलें कीं, कोर्टास ३/४ उत्पन्नांत हात घालतां येत नाहीं व त्यासंबंधानें कोणत्याही प्रकारें हुकुम मागण्यास आम्हीं आपल्या कोर्टांत आलों नाहीं. फक्त १/४ उत्पन्नाच्या व्यवस्थेसंबंधाचा हुकुम मागण्याकरितां आलों आहों. तथापि आमच्या या म्हणण्यास न जुमानतां व मयताच्या इच्छेसही जाणूनबुजून धाब्यावर बसवून आमची संमति नसतां दोन्ही बाजूची संमति आहे असा धडधडीत चुकीचा उल्लेख करून आपलें मत आमच्यावर लादून "हलवायाच्या घरावर तुलसीपत्र" व " तयार्धं मयार्धं " या न्यायानें वार्षिक उत्पन्नाचा निम्मे भाग चिंचणी येथें शिक्षणाकडे व निम्मे भाग शिरडी येथें शिक्षणाकडे खर्च करावा असा कोर्टानें अरेरावी निकाल दिला.

शेवटीं माझे सन्माननीय व विद्वान् मित्र शेट व्रजलाल नरसीलाल शहा यांच्या इच्छेस मान देऊन आम्ही कोर्टास अशी विनंती केली कीं, धारा व खर्चवेच वजा जातां ३/४ उत्पन्नाचा निम्मे भाग आम्ही चिंचणी हायस्कूलमध्यें बाबांच्या नांवानें शिष्यवृत्त्या देऊन खर्च करूं व निम्मे भाग शिरडीच्या शाळे-करितां खर्च करूं. परंतु याही योजनेस कोर्टानें मान न देतां आपलाच अरे-रावी निकाल कायम ठेविला.

" मुरारेस्तृतीयः पंथः " अशा प्रकारचा खालच्या कोर्टाचा निकाल वर्षातच हायकोर्टास मान्य झाला नाहीं, व तो त्यांनी तावडतोब रद्द केला.

या निकालानें विरुद्ध बाजूचें यशाचें स्वर्गीय धवलशिखर ढांसळून ना सर्व उत्पन्नाचा निम्मे भाग ना ½ उत्पन्नाचा निम्मे भाग, म्हणजे ना स्वर्ग ना मृत्युलोक असें होऊन "त्रिशंकुरिव अंतराळे स्थि" अशी तिची स्थिति झाली. आमच्याशीं विरोध करून विरुद्ध बाजूनें मिळविलें काय ? तर कांहीं नाहीं. उलट श्रम व कोर्टखर्च मात्र सोसावे लागले. दोन्ही कोर्टाचा अजमासें १५०-२०० रु. खर्च व श्रम यापेक्षां आमच्याही पदरांत जास्त कांहींच पडलें नाहीं. तथापि आमचें कोणत्याही प्रकारें नुकसान न होतां पुन्हा अर्ज करून दाद लावून घेण्याचा आमचा हक्क कायम राहून "स्थान न सुटतां गेलों आलों, चेष्टा बुद्धीच्या" या मातृभाषेंत रचलेल्या किर्लोस्कर संगीत शाकुंतल नाटकांतील घनाक्षरीच्या अंतिम चरणद्वयांत वर्णिलेल्या दुष्यंत-नृपोक्तिप्रमाणें आम्ही जेथें पूर्वी होतों तेथेच राहिलों.

नामदार हायकोर्टांतून वरीलप्रमाणें निकाल लागल्यावर कांहीं दिवसांनीं बी. बी. सी. आय. रेल्वेच्या चिंचणीनजीकच्या वाणगांव नांवाच्या स्टेशनवर सायंकाळच्या मुंबईहून सुरतेस जाण्याच्या गाडीच्या वेळीं विरुद्ध बाजूपैकीं चिंचणीचे राहणारे एक सद्गृहस्थ मला भेटले व "लंगडें तर लंगडें, पण गांवखुरी चरेना" या म्हणीप्रमाणें आपल्या अंगावर बाजू आली, आतां गप तरी बसावें कीं नाहीं ! पण तसें न करतां माझा उपहास करण्याच्या हेतूनें एकदम मजजवळ येऊन मोठ्या ऐटीनें बोलूं लागले. ते मला ओळखत होते. पण मी त्यांना ओळखिलें नाहीं. परंतु त्यांनीं मजवर अचानक केलेल्या हल्ल्यावरून ते विरुद्ध बाजूचे असावे असें मी ताडलें. ते म्हणाले, "काय हो, तुम्हाला हायकोर्टानें चांगलींच शेलापागोटीं दिलींत." मी म्हणालों, "आमच्या वांट्यास शेलापागोटीं तरी आलीं, पण तुम्हाला काय मिळालें ?" ते म्हणाले, "अहो, मिळण्याचें राहूं द्या. पण हायकोर्टानें तुमची खूपच केली !" मीं सांगितलें, "अहो, हायकोर्टानें आम्हास मूर्ख म्हटलें, पण खालच्या कोर्टाचा निकाल रद्द केला व आम्हांस तेंच हवें होतें. प्रश्न आम्ही मूर्ख किंवा तुम्हीं शहाणे हा नसून खालच्या कोर्टानें दिलेला निकाल कायम ठेवावयाचा

किंवा रद्द करावयाचा हा होता व तो प्रश्न आमच्या बाजूनें सुटला. कोर्टास पक्ष-कारावर टीका करण्याचा अधिकार असतो. पण टीका म्हणजे निकाल नव्हे. विरुद्ध टीका करून निकाल आपल्या बाजूचा देणें हें केव्हांही चांगलेंच ठरेल."

हायकोर्टाच्या निकालानें ते गृहस्थ चिडले होते. "शेषं कोपेन पूरयेत्" या न्यायानें त्यांनीं आपला राग मजवर काढून आपल्या मनाचें समाधान करून घेतलें.

माझे स्नेही शेट व्रजलाल नरसीलाल यांचा कल त्या वेळीं थोडासा विरुद्ध बाजूकडे होता. परंतु त्यांचें म्हणणें सर्वस्वीं वावगें नव्हते. ते म्हणाले, "अहो, तुमचे साईबाबा मुसलमान व तुम्हांस हायकोर्टांत जे जज्जसाहेब मिळाले तेही मुसलमानच. म्हणून त्यांनीं खालच्या कोर्टाचा निकाल रद्द केला. मीं म्हटलें, " कांहीं का असेना ! हुकुम रद्द झाला ना ? मग आतां हा शुष्क घिसाडी वाद कशाला ? " मग तेही गप्प बसले.

असो. या सर्व हकीकतीवरून एवढी गोष्ट निश्चित आहे कीं, चिंचणीस बाबांचें मंदिर व भक्तांकरितां धर्मशाळा बांधणें हें जसें आम्हांस पसंत नाहीं, तसेंच तें विरुद्ध बाजूसही पसंत नाहीं. आमचें म्हणणें काय आहे हें स्पष्ट शब्दांत मांडून आम्ही जरूर तर पुन्हा कोर्टास अर्ज करावा, अशी सवडही आम्हास हायकोर्टानें ठेविली आहे. तरी पुढें केव्हां तरी [illegible]चा आपसांत वाद न ठेवतां अनुकूल असाच शेवट होईल, अशी मला आशा आहे. मिळ-कतीवर अद्याप कर्जाचा बोजा आहे. त्या बोजांतून मुक्त झाल्यावर यासंबंधानें विचार करण्यास चांगला अवधि मिळेल. या सर्वांवर श्रीसाईपरमात्म्याची इच्छा ही आहेच. ती बलवत्तर आहे व जें होणार तें तदनुसारच होणार. म्हणून आतां हा विषय येथें पुरा करून गांवच्या विषयाकडे वळतों.

## वेढेगांवच्या जमिनीची हकीकत व शेवटचा निकाल

कै. आण्णा चिंचणकर यांनीं आपल्या मृत्युपत्रांत जी एकन्दर मिळकत दिली आहे, तिच्यापैकींच वेढेगांवची जमीन हा एक भाग आहे. या जमिनी-संबंधाची माहिती श्रीसाईलीला मासिक वर्ष ६, जोड अंक ८-९-१० यांतील १७ कलमांत पान २८-२९-३० यांवर दिली आहे.

आण्णा हयात असतांना व ते मरेपर्यंत ह्या जमिनीचें उत्पन्न ते घेत असत व धाराही भरीत असत. परंतु वेढे गांवीं सर्व जमिनीचे एकच

खातेदार असून त्या सर्व खात्यास पूर्वीपासून आत्माराम अनंत बाबरे यांचें नांव सरकार कागदीं लागलें आहे. आत्माराम अनंत व त्यांचे वडील चिरंजीव पंढरीनाथ आत्माराम हे हल्लीं मयत आहेत. या जमिनींत आण्णांचा ½ हिस्सा. आण्णा आपल्या वांट्याचा धारा आत्मारामाच्या पोटांत भरीत व आपल्या हिश्शाचें ६-७ खंडी भात स्वत: वेढ्यास जाऊन वेढ्याचा पाटील राघोरूपजा वारली यांजपासून व तो वारल्यावर त्याच्या मुलापासून आणीत, मरणाच्या पूर्वी दोनतीन वर्षें आण्णा बहुत काळ शिरडीस घालवीत, म्हणून आपल्या सर्व मिळकतींची व्यवस्था पाहण्याकरितां आण्णांनीं कै. पंढरीनाथ आत्माराम बाबरे यांस कुलमुखत्यारपत्र दिलें होतें. याबद्दल चांगला पुरावा आहे.

अण्णा ता. १५-४-२० सालीं चिंचणीस वारले. त्यांची भक्तवर्या भार्या त्यांच्यापूर्वी एक वर्ष वारली होती. त्यांना संतान मुळींच नव्हतें.म्हणून ते वारल्या-बरोबर सर्व मिळकतींचा ताबा टाणें डिस्ट्रिक्ट कोर्टाकडे गेला, व आण्णाच्या विश्वस्तांनीं ती मिळकत प्रोबेटवरून सन १९२३ सालीं डिस्ट्रिक्ट कोर्टाकडून आपल्या ताब्यांत घेतली. सन १९२३-२४ सालीं विश्वस्तांतर्फे जमिनीच्या वसुलाची वगैरे व्यवस्था पंढरीनाथच पाहत असून आलेला वसूल श्री. अच्युत नारायण ऊर्फ आण्णासाहेब खरे व श्री. आत्माराम जनार्दन करंदीकर, रा. डहाणू यांजकडे आणून भरीत असत. वसूल जमा होत असे तो फक्त चिंचणी व नेवाळें गांवचाच होत असे. वेढें गांवचा येत नसे. वेढें गांवाच्या वसुलाबद्दल पंढरीनाथास विचारलें म्हणजे फक्त हो हो करून वेळ मारून नेत असे. देवाची जमीन आहे, तिचा अपहार आम्ही करणार नाहीं, तिची व्यवस्था आम्ही लावून देऊं. असें पंढरीनाथ व आत्माराम, श्रीआत्माराम जनार्दन ऊर्फ आपासाहेब करंदीकरांजवळ नेहमीं म्हणत. आपासाहेब ही गोष्ट मला सांगत.

पंढरीनाथाकडून सदर जमिनीचें उत्पन्न मिळत नाहीं व तो कांहीं तरी धापाधापी करून जमिनीचा अपहार करण्याचा त्याचा विचार दिसतो, असा आम्हास संशय आल्यावरून जमिनीच्या वसुलाचें काम मी आपल्याकडे घेतलें व पंढरीनाथ व आत्माराम यांना सदर जमिनीच्या आण्णाच्या हिश्शाचें उत्पन्न देण्याबद्दल सन १९२६ सालीं सॉलिसिटरमार्फत नोटिस दिली. नोटिसीचे जबाब टाळाटाळीचे येऊं लागले. नंतर पंढरीनाथ व आत्माराम हे मयत झाले.

पंढरीनाथाचे धाकटे बंधु मधुसूदन यांच्याजवळ सदर जमिनीच्या उत्पन्नाचें मागणें केलें. परंतु ते नीट जबाब देईनात. श्री. आपासाहेब करंदीकर व शेट गोवर्धन गिरधर टना, डहाणू, यांनीं मध्यस्ती केली; परंतु त्यांच्या मध्यस्तीस यश आलें नाहीं व आतां कोर्टांत दावा दिल्यावाचून गत्यंतर नाहीं, असें निश्चितपणानें वाटल्यावरून श्री. मदुसूदन वगैरे असामींवर डिसेंबर १९३१ या महिन्यांत डहाणू सबजज्ज कोर्टांत दावा दिला.

आजपर्यंत पुष्कळ तारखा नेमल्या गेल्या. परंतु त्यांत कांहीं विशेष असें झालें नाहीं. आतां ता. १९-६-३३ ही नेमली होती. त्या तारखेस मी कोर्टांत हजर होतों. मागील तारखेस दावा निघाला होता. त्या वेळीं आम्हीं ½ हिशाच्याऐवजीं ¼ हिस्सा घ्यावा व मांडीबळ करावी असें विरुद्ध बाजूचें म्हणणें होतें. पण तें आमच्या वकिलांनीं कबूल केलें नाहीं. आतां वरील १९ तारखेस विरुद्ध बाजूचें म्हणणे असें आलें कीं, तुम्हां लागत असलेला ½ हिस्सा आम्हीच ठेवतों, व तुम्हास १५०० रुपये स्टॅपखर्च व या तारखेचा साक्षीदारांच्या भत्त्याचा वगैरे खर्च देतों व हें कबूल असेल तर ता. ३०-६-३३ रोजीं आम्हांस हें कळलें पाहिजे. सर्व विश्वस्तांच्या पुढें हा प्रश्न मांडून त्याप्रमाणें ता. ३०-६-३३ रोजच्या आंत तुम्हास कळवितों असें मी व आपासाहेब करंदीकर यांनीं कोर्टास कळविलें.

येणून पुढें जें घडेल तें यथावकाश कळवीन.

**अनुष्टुभ छंद**

**संग्राम सत्वरीं संपो । सत्य संजय हो सदा ।**
**स्वामी साईसद्गुरूला । संप्रार्थी साइसूनु हा ॥**

संतपदरजानुदास,

ठाणें २२-६-३३ **बाबांचें बाळ**

वरप्रमाणें मीं बाबांची अनुष्टुभ छंदांत प्रार्थना केली, व ता. २०-६-३३ रोजीं ठाण्यास आलों. नंतर तडजोडीचा कागद श्री. बाबासाहेब तर्खड व मोरेश्वरराव प्रधान यांच्यापुढें ठेवून त्यांना ती गोष्ट समजाऊन देऊन त्यांच्या सह्या त्या कागदावर घेतल्या. नंतर तो कागद आमचे वकील श्री. रघुनाथ आत्मा-

राम करंदीकर यांच्याकडे पाठविला. त्यांनीं तो ३०-६-३३ रोजीं कोर्टास दाखविला. कोर्टानें निकालाची तारीख १८-७-३३ नेमली. मी ता. १३ रोजी नेवाळयाची जमीन खंड करारानें देण्याकरितां चिंचणीस जाऊन त्याच दिवशी सायंकाळीं डहाणूस आलों.

तारीख २२-७-३३ पर्यंत मी डहाणूस राहिलों. १८-७-३३ रोजीं मंगळवारीं डहाणू कोर्टानें निकाल दिला तो असा कीं, प्रतिवादींनीं वादीस वेढेगांवच्या जमीनीपैकीं एकचतुर्थांश हिस्सा द्यावा. वादीची मालकी व कबजा शाबीत झाला आहे. वादीनें हा एकचतुर्थांश हिस्सा प्रतिवादीस (१५००) पंधराशें रुपयांस विकत द्यावा. प्रतिवादींनीं वादीस ही १५०० रुपयांची रक्कम स्टँपचा व साक्षीभरत्याचा व झालेल्या इतर खर्चाची रकम (वकील फी खेरीज करून) एक वर्षांत द्यावी १५०० रुपयांची रक्कम देईपर्यंत त्या रकमेवर दरमहा दरशेंकडा आठ आणेप्रमाणें व्याज द्यावें.

ह्या एकचतुर्थांश हिश्शावर कोर्टानें चार्ज ठेवून निकाल ठेवून निकालांत पुढें असें लिहिलें आहे कीं, १ वर्षांत प्रतिवादींनीं वादीस वरील रकम दिली नाहीं, तर वादींनीं प्रतिवादींना विकलेल्या एकचतुर्थांश हिश्शाची कोर्टमार्फत विक्री करावी व विक्रीच्या पैशांत वरील रकमेची म्हणजे हुकुमनाम्याच्या रकमेची भरपाई करून घ्यावी. भरपाई न झाल्यास प्रतिवादींची इतर स्थावरजंगम मिळकत विकून वादींची रकम पुरी करून घ्यावी.

याप्रमाणें सन १९३१ च्या डिसेंबर महिन्यापासून या फिर्यादीचें काम चालून तें १८ जुलई १९३३ रोजीं पुरें झालें व या कलहांत बाबांनीं यश दिलें ही त्यांची कृपा.

या कामीं कै. आण्णाचे ट्रस्टी स्वस्थ बसले नव्हते. त्यांनीं शक्य ते प्रयत्न चालविले होते व शेवटीं त्यांचे प्रयत्न सिद्धीस गेले. ही बाबाची लीला.

आण्णाच्या मृत्युपत्रांतील अट काढून टाकण्यासंबंधाच्या ठाणें डिस्ट्रिक्ट कोर्टांत दिलेल्या अर्जाच्या कामीं श्री. भाईसाहेब चित्रे वकील यांनीं वकीलफीबद्दल आमच्याकडून पैही न घेतां तें काम बाबांचें आहे असें म्हणून फुकट चालविलें. मुंबई हायकोर्टांत हें महाराजांचें काम आहे म्हणून श्री.

रामदत्त विठोबा देसाई वकील व श्री. बाळाजी सदाशिवराव वकील यांनी वकील फीबद्दल पै न घेतां सर्व काम फुकट चालविलें.

डहाणू सबजज कोर्टांत बेदयाच्या जमीनीचें काम म्हणजे श्रीसाई-बाबांचेंच काम आहे असें समजून श्रीयुत रघुनाथ आत्माराम करंदीकर वकील यांनी वकीलफी न घेतां हें काम फुकट चालविलें.

या त्यांच्या उदार अंतःकरणाबद्दल शिरडी संस्थान कमिटी व आण्णाचे ट्रस्टी वरील चारी सद्गृहस्थ वकिलांचे फार फार आभारी आहेत व हीं चारी वकील मंडळी खरोखरच स्तुतीस पात्र आहेत. बाबा त्यांचें कल्याण करोत अशी मी बाबांच्या चरणीं नम्र विनंती करतों.

१५०० रु. व खर्चाची रक्कम हातीं येईल तेव्हां दाव्याचा खरा निकाल झाला असें जरी खरें आहे, तरी ट्रस्टींनी आपली जबाबदारी ओळखून आपलें कर्तव्य बजावलें व एकचतुर्थांश हिश्शाची मालकी व कबजा कोर्टांतून शाबीत करून घेतला, ही गोष्ट निर्विवाद आहे. असो, आतां पुढें, जसें बाबांच्या इच्छेस येईल तसें घडेल.

या कामीं मला ज्या ज्या ओळखीच्या व अनोळखीच्या सद्गृहस्थांनीं, माझ्या मित्रांनीं, व्यवसायबंधूंनीं मदत केली त्या सर्वांचा मी अत्यंत ऋणि आहें.

साकी

युद्ध संपलें, न्यायमूर्तिनीं समेट घडवुनि आणला ।
बेदें जमिनीच्या दाव्याचा, शेवट गोडचि झाला ॥
चाल:—लीला बाबांची । नकळे सत्य विरिंची ॥

वरील द्वादशपत्ररूपी द्वादशदल वाक्गुलाबपुष्प श्रीसमर्थसद्गुरु संत-साम्राट् अमरचक्रवर्ति बाबांच्या पुण्य पूज्य पवित्र पादपंकजीं अर्पण करून आपली रजा घेतों.

डहाणू,<br>गुरुवार मिति आषाढ<br>कृ. १३ शके १८५५<br>ता. २१-७-३३

संतचरणरज दासानुदास,

**बाबांचें बाळ**

## श्रीदत्तचित्साईसद्गुरुभ्योनमः

श्रीसाईलीला संपादकमहाशय यांस,

सप्रेम कृतानेक शि. सा. प्रणिपात वि. वि. हल्लीं चालू असलेल्या भाद्रपद महिन्याचा प्रसिद्ध झालेला श्रीसाईलीलेचा अंक वाचला. त्यांतील बाबांच्या पुण्यतिथि–उत्सवकार्यक्रमांत जास्त मजकूर व एके ठिकाणीं दुरुस्ती पाहिजे असें मला वाटतें. यत्या अश्विन महिन्याच्या अंकांत खालीं लिहिल्या प्रमाणें जास्त मजकूर घालावा व दुरुस्ती करावी अशी विनम्र प्रार्थना आहे.

### गुरुवार २८-९-३३

**सकाळीं ८-१०** श्रींचे समाधिपुढें श्री. शिरवळकरबुवांचें नैत्तिक गायन

**दुपारीं ३-४** ,, ,, ,, ,, ,, पुराण

### शुक्रवार २९-९-३३

**सकाळीं ८-९** श्रींचे समाधिपुढें श्री. शिरवळकरबुवांचें नैत्तिक गायन

**दुपारीं–४-५** ,, ,, ,, ,, ,, पुराण

### शनिवार ३०-९-३३

येथें शनिवारचे ठिकाणीं सोमवार असा शब्द चुकीनें छापलेला दिसतो करितां सोमवारच्या ठिकाणीं शनिवार असें छापावें.

**सकाळीं ८-११** श्रींचे समाधिपुढें श्री. शिरवळकरबुवांचें नैत्तिक गायन

### रविवार १-१०-३३

**सकाळीं ८-१०** श्रींचे समाधिपुढें श्री. शिरवळकरबुवांचें नैत्तिक गायन.

ठाणें, रविवार, भाद्रपद
शु. ७, शके १८५५

संतपदरज दासानुदास,

**बाबांचें बाळ**

# श्रीसाईबाबा

## ऑगस्ट महिन्याचें शिर्डीवृत्त

ऑगस्ट महिन्यांत श्रीक्षेत्र शिर्डी येथें १३ भक्तजन श्रीसाई-समाधि-र्शनाकरितां देवगड, रत्नागिरी, पुणें, नाशिक, अंधेरी, नागपूर, मुंबई, कलकत्ता वगैरे ठिकाणाहून आले होते.

सालाबादप्रमाणें शिर्डी येथील गांवकरी लोकांनीं, गोकुळ-अष्टमीचा त्सव साजरा केला. सात दिवस नामसप्ताह चालू ठेवून जन्मअष्टमीस श्रीयुत खवळकर गवई यांचें कीर्तन झालें व काल्याचें कीर्तनही त्यांनीं केलें. त्सवांत दोन मण तांदुळांचा गोड भात-कढी केली होती. श्रींचे नोकर मंड-ळींनी उत्सवांत श्रींस नैवेद्य, सुंठवडा, डींगवडा व प्रसाद ( खिरापत ) वांटली रथाची मिरवणूक काढली होती. श्री. ह. भ. प. विश्रामबुवा यांचे शिष्य श्रीयुत रामचंदबुवा आमडदेकर यांचें कीर्तन ता. ३१-८-३३ रोजीं झालें.

## संस्थानास भक्तांकडून आलेल्या जिनसा वगैरे

श्रीमती बेनाबाई अजिंक्य—१ मधाची मोठी बाटली श्रींच्या नित्य-सेवेकरितां.

श्रीयुत गणपत आत्माराम कीर्तिकर यांजकडून श्रीसमाधीस एक चांदीचा तोळा १४ आणे भार उजवा हात, त्यांच्या कुटुंबाचा हात बरा झाल्याबद्दल.

एका साईभक्ताकडून संस्थेस रु. ३३ किंमतीचा तंबोरा व डगा संस्थेच्या गवयाच्या उपयोगाकरितां देण्यांत आले.

त्याचप्रमाणें दुसऱ्या एका भक्ताकडून संस्थेस रु. २७, सतार; तारा वगैरे संस्थानच्या गवयाच्या उपयोगाकरितां आले आहेत.

साईभुवन,
१४१, प्रिन्सेस स्ट्रीट,
२।९।३३

**सु. दि. नवलकर,**
ऑ. चिटणीस,
श्रीसाईबाबा शिर्डी संस्थान.

# कै. कमलाक्ष विश्वनाथ प्रधान

कै. कमलाक्ष विश्वनाथ प्रधान त्यांच्या अत्यंत शोचनीय निधनापूर्वी सुमारें १०-१२ दिवसांआधीं रा. ब. मोरेश्वरराव प्रधान यांच्या घरून सान्ताक्रूझ स्टेशनकडे जात असतां लेखकाला वाटेंत भेटले. रस्त्यांत त्यांनीं स्वयंस्फूर्तीनें केलेली कविता वाचून दाखविली. त्यांच्या चर्येवर अत्यंत हर्ष व उत्साह दिसत होता. ते म्हणाले कीं, त्यांना आदल्या रात्रीं पहाटेस एक स्वप्न पडलें. त्यांत आपण शिरडीस श्रीद्वारकामाईंत आहोंत व श्रीसाईबाबांनीं जवळ बोलावून त्याहातींस बसवून दोन घास स्वहस्तानें भरविले. हें स्वप्न बरें कीं वाईट असा त्यांनीं प्रश्न केला आणि म्हणाले कीं, कांहीं लोक हें स्वप्न बऱ्यांतलें नाहीं असें त्यांना म्हणाले. लेखकाला हें स्वप्न म्हणजे स्पष्ट रीतिनें श्रींचें त्यांना स्वगृहींचे आवाहन त्यांचें अध्यात्मिक पोट भरून केलेलें असावें असें वाटलें. परंतु त्यांच्या त्या अत्यंत उल्हसित वृत्तीवर विरझण पडूं नये, म्हणून श्रींची आपणांवर पूर्ण कृपा आहे. असें त्यांना उत्तर दिलें. स्टेशनपर्यंत ते लेखकासोबत होते व आपली कविता कशी काय आहे, आपण लीलेंत छापाल काय वगैरे पृच्छा केली. त्यांचा हा कवितेचा पहिलाच प्रसंग आहे, हें जाणून व स्वयंस्फूर्तीनें व सद्गुरुमाउलींचा पाठिंबा त्यांत दिसून आल्यामुळें त्यांची ती कविता लेखकानें श्रीलीलेंत छापण्याची कबुली आनंदानें दिली. त्यामुळें त्यांना अत्यंत हर्ष वाटून ते लेखकाचा निरोप घेऊन स्वगृहीं गेले.

त्यानंतर सुमारें पंधरा दिवसांनीं त्यांच्या निधनाची खबर मिळाली. असें कांहीं तरी होणार असें लेखकाला वाटत होतेंच, परंतु श्रीयुत कमलाक्ष इतक्या लवकर आपल्या मुलांलेंकरांना, आप्तसुहृदांना व मित्रमंडळींना सोडून श्रीसाईचरणीं लीन होतील असें वाटलें नव्हतें.

कै. कमलाक्ष विश्वनाथ प्रधान बी. ए., एलएल. बी. यांचा जन्म सन १८९४ सालीं जुन्या हनुमान गल्लींमध्यें त्यांच्या वडिलार्जित घरीं झाला. या जागेला श्री. पाठारे प्रभु मंडळी "चौघरें" या नांवानें संबोधित असतात.

कै. कमलाक्ष यांची उमेद व आकांक्षा आपण एक पहिल्या प्रतिचे सॉलिसिटर व्हावें अशी होती. आणि एका प्रसंगीं श्रीसाईबाबांच्या चरणांपाशीं बसले असतां, " बाबा, मला मला एक उत्तम सॉलिसिटर करा ! " अशी त्यांनीं मानसिक प्रार्थना केली. ज्या प्रार्थनेचा जबाब तात्काळ त्याच वेळीं मिळाला " हां ! होशील जा ! त्यांत काय मोठी विशाद आहे ! "

त्यानंतर अशी कांहीं परिस्थिति उत्पन्न झाली कीं, कै. दीक्षित यांचे स्वत:च्या हपिसांतल्या कामांत मन रमेना. म्हणून रा. ब. मोरेश्वरराव प्रधान यांची सूचना मान्य करून त्यांनीं ( दीक्षितांनीं ) आपल्या कचेरींत कै. कमलाक्ष यांची आर्टिकल्ड क्लार्कच्या जागेवर नेमणूक केली. ( ही आर्टिकल्ड क्लार्कची नेमणूक शेवटचीच झालेली आहे ! )

असो. श्रीसाईबाबांच्या वरील आशीर्वादानुसारें कै. कमलाक्ष हे सन १९२३ सालीं सॉलिसिटर झाले, आणि मेसर्स मूळजी प्रधान, आणि परेरा या सॉलिसिटर कंपनीचे मुख्य भागीदार झाले. आणि ही संस्था त्यांच्या मृत्युपर्यंत उत्तम जोमानें चालवून तिला प्रसिद्धिस आणली.

त्यांच्या अकाली निधनामुळें सदरील संस्थेस, तसेंच त्यांच्या तरुण पत्नीस व आठ वर्षांच्या कन्येस, आप्त सुहृदांस व मित्रमंडळीस भयंकर धक्का मिळाला आहे, जो सहन करण्यास श्रीसाईमाउलीच सामर्थ्य देईल.

त्यांच्या प्रिय पत्नीकडून मिळालेलीं ओंवीबद्ध कवनें खालीं छापण्यांत येत आहेत. त्यांशिवाय त्यांनीं श्रीसाईबाबांवर केलेलीं साध्या चालींतलीं पदें जीं त्यांनीं लेखकाला रस्त्यांत वाचून व गाऊन दाखविलीं तीं उपलब्ध झाल्यास जरूर छापण्यांत येतील.

आतां वंदूं मम तात । नाम जयाचें विश्वनाथ ॥
जन्म घेऊन प्रधान कुळांत । साधण्या परमार्थ सदैव दक्ष ॥ १ ॥

माता तयाची मुक्ताबाई । तिच्या सेवेंत तत्पर राही ॥
कुटुंब पोसण्याची काळजी घेई । पोरवयीं लवलाही ॥ २ ॥

भ्रातृनिधनीं शिक्षण अपुरें । राहिलें तयाचें दैवानुसारें ॥
चरितार्थाचा बोजा शिरें । सांवरे बालपणींच ॥ ३ ॥
शिक्षण आणि चरितार्थ । दोन्ही साधणें दुरापस्त ॥
परंतु विश्वनाथानें केलें तें सार्थ । स्वहितार्थ त्यांतचि मानिलें ॥ ४ ॥
लानपणी नोकरी करूनि । शिक्षण पूर्ण केलें त्यांनीं ॥
निवारिली भ्रातृनिधनाची हानी । निज जननि येणें संतोषविली ॥ ५ ॥
उच्च पदीं जरी चढला । परमार्थ साधण्या जागृत राहिला ॥
दंभ लोभ दूर राखिला । यांतचि लाधला स्वहितार्थ ॥ ६ ॥
संपत्ति मिळविणें जरी ध्येय । त्यांतचि न राहे या जन्मींचें कार्य ॥
सदैव जाणें हें खरा आर्य । आचार्य शिक्षण याच रीतीं ॥ ७ ॥
विश्वनाथें तैसेंच केलें । मिळविले पैसे नाहीं राखिले ।
कुटुंबपोषणार्थ कांहीं राखिले । उरलेसुरले तीर्थयात्रीं ॥ ८ ॥
शंकरपूजनीं सदा तत्पर । इच्छा न जाणें इतर ॥
बाधक होतां मुक्तिस सत्वर । पामर ज्यानें मोहिं पडे ॥ ९ ॥
संसारीं असूनि वैराग्यपूर्ण । मिळविलें ज्यानें संपूर्ण ॥
केलें दुर्वासनेचें चूर्ण । अर्पण केलें शिवालागीं ॥ १० ॥
नावडे तया कोणाची निंदा । स्वकामीं नित्य राही बंदा ॥
नाहीं ठावे त्या इतर धंदा । व्यर्थ उठाठेवी करण्याचा ॥ ११ ॥
कोणाचेंही कार्य होतां त्वरें । आनंदचि त्यांत मानी सत्वरें
आपुलेंही होईल ऐसेंच निर्धारें । द्वेष वारे दूर सारी ॥ १२ ॥

---

मातु:श्री तातीबाई । माझ्या प्रारब्धींची तूंच आई ॥
म्हणून तूतें लवलाहीं । साष्टांग नमन करीतसें ॥ १ ॥
पुत्रास मातृ दैवत । सुपुत्रास नलगे आणिक व्रत ॥
मातेच्या पायीं तीर्थेंही तिष्ठत । देवही लोळत त्याच चरणीं ॥ २ ॥

याची जाणीव त्वांचि दिली । वेळोवेळीं घोकणी केली ॥
मम हृदयांत जागृति राखिली । मातृदैवताची सदोदित ॥ ३ ॥

नाहीं तरी मीं नीच पामर । उच्छृंखल वृत्तिचा साचार ॥
स्वसुखास सदोदित लाचार । काय करी तो न कळे ॥ ४ ॥

कांहीं गांठी होतें सुकृत । म्हणोनि झालों तुझा पुत ॥
सार्थक करण्याचें मिळालें व्रत । तव कृपें करोनियां ॥ ५ ॥

लहानपणीं चांगलें शिक्षण । आणि उच्च दर्जाचें वळण ॥
सद्धर्माची ठेवण । मातेवांचून पुत्रास मिळेना ॥ ६ ॥

जगीं लौकिक ज्यानें मिळविला । राष्ट्राचा झेंडा ज्यानें चढविला ॥
महाराष्ट्राचा बाणा राखिला । ऐशा शिवबास माता कारणीभूत ॥ ७ ॥

नसती जरी जिजाई माता । कैसा शिवाजी उद्‌भवता ॥
कोण होय हिंदुधर्म राखिता । मराठेशाहीचा पाया कोण घालिता ॥८॥

तैसीच होय माता ध्रुवासी । नेण्यास कारण अढळपदासी ॥
तैसिच माता पुंडलिकासी । अमर करण्यासी कोण कारण ॥ ९ ॥

ताती तुझा होतों बाळ । केले नाना तऱ्हेचे चाळ ॥
व्यर्थ घालविला काळ । लहानपणींचा सर्व मीं ॥ १० ॥

न मानिलें तुझें शिक्षण । न मानिलें तुझें वळण ॥
स्वैरपणें केलें चलन । तेणें स्वहिता आंचवलों ॥ ११ ॥

नाहीं तरी झालों असतों साच । गांधी टिळक शिवाजी ऐसाच ॥
देशोद्धारा करण्यासच । कारणीं पडलों असतों मीं ॥ १२ ॥

तरी जें थोडें तुझें ऐकिलें । तेणेंच माझें कल्याण घडलें ॥
माझें त्यानेंच सार्थक झालें । शंका नसे अणुमात्र ॥ १३ ॥

तुझी अल्प जी सेवा केली । तीच माझी काशी झाली ॥
साईदर्शनास तीच फळावली । जेणें सार्थक झालें जन्माचें ॥ १४ ॥

नाहीं तरी मी पापी पामर । स्वार्थांतची तरंगे वरचेवर ॥
मज केवि मिळता संतांचा कर । अल्प वयांत हें कळेना ॥ १५ ॥

तुझें पुण्य कामा आलें । तुझ्या आशीर्वादें आम्हां घडलें ॥
संतदर्शन अनायासें । हा सर्व प्रताप तुझाच कीं ॥ १६ ॥

नाहीं तरी काय आमुची थोरी । आपआपसांतची भांडूं सारीं ॥
देऊं एकमेकांसीं वैखरी । यांतचि थोरवी मानूं आम्ही ॥ १७ ॥

कसा त्यास दिला टोला । जणूं साखरेंत बुडविलेला गोळा ॥
कसा त्याच्या जिरविला बोला । त्यांतचि घमेंड मानूं आम्ही ॥ १८ ॥

एकमेकांचा करूं हेवा । न जाणूं भावा भावा ॥
वैरीपणाचा जणूं ठेवा । ओतप्रोत आमुच्यांत ॥ १९ ॥

स्वभावें जरी आम्ही ऐसे असों । तव कृपे हें सर्व नासो ॥
आमुचे दुर्गुण सर्व पुसो । आशीर्वादें तुझ्याच ॥ २० ॥

आतां कृपा करीं आम्हां सर्वांवरी । आमुच्या सर्व चिंता दूर सारीं ॥
आम्हांस नेईं जगांत उच्चत्वावरी । पुरवीं मनोरथ आमुचे सर्व ॥ २१ ॥

आनंदे अन्नपूर्णे परमानंदे ॥
तव चरण हे कमळाक्ष वंदे ॥
सदा राहें ध्यानीं परम सुख भोग भोगी ॥
धन्य ते माता मज करून निजानंद योगी ॥

खार, ता. ११-९-२३ **संपादक.**

## वर्गणीदारांकरितां

१ श्रीसाईलीलेचा वर्षारंभ चैत्र महिन्याचे अंकापासून आहे. नवीन वर्गणीदारांस वर्षारंभापासून अंक घ्यावे लागतील.

२ पत्ता बदलणें झाल्यास लगेच आम्हांस कळवावें. बदललेला पत्ता न कळविल्यामुळें कित्येक वेळां अंक गहाळ होतात.

३ अंकासंबंधीं पत्रव्यवहार आमचेकडे करावा.

४ लेखासंबंधीं पत्रव्यवहार संपादक व प्रकाशकांकडे करावा.

## वार्षिक वर्गणी.

वार्षिक वर्गणी टपाल खर्चासह मनिऑर्डरनें आगाऊ रु. ३।≈, व्ही. पी. नें रु. ३॥, फुटकळ अंक ।≈, मागील अंकास शिल्लक असल्यास ॥-

व्यवस्थापक—**श्रीसाईलीला**

## लेखकांकरितां

१. श्रीसाईलीलेंस प्रसिद्धीसाठीं पाठविलेला लेख अथवा कविता कागदाच्या एका बाजूवर,मार्जिन सोडून,सुवाच्य बालबोध लिपींत असावी. पेन्सिलीनें किंवा कागदाचे दोन्हीं बाजूस लिहिलेला मजकूर छापण्यास फार त्रास पडतो.

२. लिखाणासोबत पूर्ण नांव व पत्ता दिला पाहिजे. नांव प्रसिद्ध न करितां टोपण नांवाखालीं प्रसिद्धी द्यावयाची असल्यास त्याप्रमाणें कळवावें.

३. लेख अथवा कविता हातीं आल्यानंतर १ महिन्यांत पसंती अगर नापसंती कळविली जाईल. पसंती कळविल्यानंतर, आम्हांला कळविल्याशिवाय लेखकांनीं तो मजकूर दुसरीकडे छापविण्यास देऊं नये.

४. लेखांत योग्य तो फेरफार करण्याचा अधिकार आमचेकडे राहील. येईल तसा शब्दशः प्रसिद्ध करण्याची हमी आम्हीं घेत नाहीं.

५. लेखासोबत पुरेसें पोस्टेज आल्यास, नापसंत लेख परत करूं.

प्रकाशक—**श्रीसाईलीला**

"दक्षिणा प्राइज कमिटीनें बक्षिस दिलेला व केसरी, चित्रमयजगत्, ज्ञानप्रकाश, विविधज्ञानविस्तार, व रत्नाकर वगैरे वृत्तपत्रें व मासिकांनीं उत्कृष्ट अभिप्राय दिलेला असा संतकवि ह. भ. प. **श्री दासगणू महाराज** यांनीं नवीन रचिलेला व प्रोफेसर श्री. नी. चाफेकर, M. A., LL. B. यांनीं प्रस्तावना लिहिलेला नवीन ग्रंथ

## श्री पासष्टी–भावार्थ दीपिका

हा **नरेंद्र बुक डेपो दादर**, मुंबई येथें मिळेल.

कापडी प्रत १० आणे.                साधी प्रत ८ आणे.

सर्व प्रकारचे मेंदूचे विकारांवर जागरण व मानसिक श्रम करणाऱ्यांस अत्यंत उपयोगी

नकलेबद्दल ] **ब्राह्मी तेल** [ सावध असावें.

**बाळबाळंतिणीकरितां औषधें**

**बाळंत काढा नं. १** पहिल्या दहा दिवसांचा ८।१८; **बाळंत काढा नं. २** दहा दिवसानंतर ८।१४; **बाळकडू:**—मूल जन्मल्यापासून देण्यास योग्य ८८; **कुमारी आसव** लहान मुलांकरितां ८।१२.

**सतत २५ वर्षें लोकादरास पात्र झालेलें, कोणत्याही ऋतूंत घेण्यास योग्य, अत्यंत मधुर व आरोग्यदायक**

एक रत्तल १८१० ) **द्राक्षासव** ( अर्धा रत्तल ८१४
दीड रत्तल २८८                      ट. ख. पॅ. नि.

शिवाय आमचे कारखान्यांत टिकाऊ तयार काढे, आसवें, अरिष्टें, भस्में वगैरे ५०० वर औषधें तयार आहेत. त्यांचे माहितीचा मोठा कॅटलॉग व प्रकृतिमान मह्न पाठविण्याकरितां "रुग्ण–पत्रिका" ही सात आण्यांची तिकिटें आली असतां पाठवूं.

**दत्तात्रय कृष्ण सांडू ब्रदर्स** आर्यौषधी कारखाना, चेंबूर जि. ठाणें.
टे. नं. ८७०२४ × २२२७८. दुकान दवाखाना, ठाकुरद्वार, **मुंबई** नं० २
**पुणें:—श्री साईनाथ** आणि **कंपनी.**

हें पुस्तक श्रीलक्ष्मीनारायण छापखाना, ३६४ ठाकुरद्वार, मुंबई येथें **अनंत आत्माराम मोरमकर** यांनीं छापून
**रा. आ. तर्खड** यांनीं ५, गेंट मार्टिन रोड, वांद्रें येथें प्रसिद्ध केलें.